॥ ७६५७ ॥ जरी असे पाहों ये मी। दिसे कर्मी अधिकारू ॥ १ ॥ समर्था मानिसी तरी। कृपा करी महाराजा ॥ २ ॥ आपणातें तूं अव्यया। योगनिलया दाखवीं ॥ ३ ॥ अधिकारू तुझ्या मुखें। तुकया सुखें झालासी ॥ ४ ॥

॥ ७६५८ ॥ हरिखे पार्थाचीये स्तुती। तो श्रीपती साहेना ॥ १ ॥ ह्मणे उदार वाक्यानें। शतशतानें पश्यमे ॥ २ ॥ सहस्रशें रूपें पार्था। त्यांत वृथा ना कोणी ॥ ३ ॥ दिव्य नाना प्रकारचीं। आकृतिचीं भिन्नत्वें ॥ ४ ॥ जे कां वेधक तुकयाचें। मीपणाचें मूळ नाशी ॥ ५ ॥

॥ ७६५९ ॥ वसु रुद्र देव पाहे। आणि पुत्र हे अश्विनी ॥ १ ॥ देखिले तें नाहीं पाहे। मग तूं लाहो घेसील ॥ २ ॥ भारता हें बहु नवल। पूर्वी बोले अदृष्ट ॥ तुकयाचा भाव जैसा। हरि तैसा बोलिला ॥ ४ ॥

॥ ७६६० ॥ देहीं माझ्या या एकत्र। भरींव पात्र न्याहाळी ॥ १ ॥ चराचर पाहे आजी। कोठें न दुजी कल्पना ॥ २ ॥ गुडाकेशा सर्व विश्वा। मी विसांवा अक्षयी ॥ ३ ॥ जें एकहा पाहिलिया। इच्छा तुकयाची गेली ॥ ४ ॥

॥ ७६६१ ॥ परि याच स्वदृष्टीनें। अदेखणें होईल ॥ १ ॥ मज पाहों नाशकसी। हें मानसीं उमजलों ॥ २ ॥ तुतें देतों दिव्यदृष्टी। जेणें कष्टी ना होसी ॥ ३ ॥ पाहे ईश्वरी हा योग। निरुद्वेग तुकयाचा ॥ ४ ॥

॥ ७६६२ ॥ उल्हासला संजय बोले। हें ऐकिलें कीं नाहीं ॥ १ ॥ राया ऐसें बोलेनियां। पार्थमीया श्रीकृष्ण ॥ २ ॥ महा योगेश जो हरी। दावी सारी स्वकळा ॥ ३ ॥ रूप श्रेष्ठ परमेश्वर। करी गोचर तुकयासी ॥ ४ ॥

॥ ७६६३ ॥ नाना नेत्र मुखें ज्यांत। जें विक्रांत सौम्य हीं ॥ १ ॥ नाना दर्शनें अद्भुत। पाहतां मुक्त पातका ॥ २ ॥ दिव्य नाना आभरणें। दिशा जेणें समजेना ॥ ३ ॥ आयुधें नाना तीक्ष्ण करीं। तुकया शिरीं वंदितु ॥ ४ ॥

॥ ७६६४ ॥ दिव्यपुष्पीं वस्त्रीं दिव्य। मूर्ती भव्य रूपाच्या ॥ १ ॥ दिव्य गंधा विभूषिता। वासुवातादि वेढे ॥ २ ॥ दिव्य सर्वाश्चर्यमय। झाला कौंतेय विस्मितु ॥ ३ ॥ जगदात्मक जो अनंतु। तुका संतु ज्या साठीं ॥ ४ ॥

॥ ७६६५ ॥ नभ उजळलें तेजें । नेणो सहस्रया पैजें । स्वीकारूनी दिनकर राजे । प्रभा पार्था दाविती ॥ १ ॥ तेज नव्हे तो बंबाळ । जीव पतंगा कवळ । ऐसे एकाकी कल्लोळ । एकसरें ऊठिला ॥ २ ॥ माहात्म्य पूर्वीं जें ऐकिलें । तें एकाकीं रूपा आलें । माहात्म्याचें नवल झालें । संगीं सांगाया नुरे ॥ ३ ॥ असो बोलणें बोलतां । रवीहून उपमीतां । तुका ह्मणे दशांशता । उपमा नसे श्रुतीची ॥ ४ ॥

॥ ७६६६ ॥ कामधेनुपासुनि पात्र । होय एकाचे सहस्र ॥ तैसा एक होता उग्र । मूर्तिमय मग झाला ॥ १ ॥ नकळे पाहिली मागिली । वडिल कोणती धाकली ॥ पृथक् पृथक् विस्तारली । सृष्टि वेळ यापरी ॥ २ ॥ देव देवाच्या शरीरीं । देखे तेव्हां कौरवारी ॥ तुका ह्मणे लोभ नगरीं । प्रवेशला भयभीतु ॥ ३ ॥

॥ ७६६७ ॥ लहानसी मूर्त्ती होती । गुप्तपणें गेली केउती ॥ घेउन आली ऐशा व्यक्ती । होत्या कोण्या संदुकींत ॥ १ ॥ हेंच आश्चर्याचें मूळ । कांटे उठले सोज्वळ ॥ नेणों विनोदें सकळ । आमुचें ही नाशील ॥ २ ॥ ईश देखिला ही जरी । मायिक मोह न वचे दुरीं ॥ बाप देहाची हे थोरी । मरे होय न लाजे ॥ ३ ॥ असे अर्जुन कंपित । देवा मस्तकीं वंदित । तैसे कृतांजळी हात । तुका ह्मणे बोलतो ॥ ४ ॥

॥ ७६६८ ॥ देहीं तुझ्या विश्वंभरा । देखे सुर भर संभारा ॥ देखे वहनी साळंकारा । हंती हंती येरा उद्दीत ॥ १ ॥ आणिक एक नवलावो । पंच भूतां तुझा ठावो ॥ त्याचें दिसतें येवो जावो । पैं आधारें तुमच्या ॥ २ ॥ चराचर त्याच परी । ब्रह्मा पद्म स्थानांतरीं ॥ अहो पाहातां त्रिपुरारी । जटाजूट गंगेसी ॥ ३ ॥ मुनी दिव्य तेजोमय । नागकुळ समुदाय । ऐसा पाहिला प्रत्यय । तुका साधू ज्यासाठीं ॥ ४ ॥

॥ ७६६९ ॥ नानाप्रकारी जे दंड । मुखें कराळ वितंड ॥ नेत्र वैश्वानर कुंड । पोटें तैसीं भ्यासुरें ॥ १ ॥ त्वद्रूप सर्वत्र अनंत । मोठें पाहातां नलगे अंत ॥ अनादि तूं विश्वतात । मध्य अंत ही तूंची ॥ २ ॥ तुज पाहे विश्वेश्वरा । विश्वरूपाच्या अंतरा ॥ तुका ह्मणे कमळावरा । भलीरे आस पुरविली ॥ ३ ॥

॥ ७६७० ॥ गदा धरिली उजवी । चक्र झळफळीत तेवीं ॥ माथा मुगुटाची ठेवी । अनुपम वाटते ॥ १ ॥ आज तेज सिंधु लहरी । घाली ढाळ

आह्मावरी ॥ सर्वत्राहि दिशांतरीं । दीप्ति मोठी फांकते ॥ २ ॥ सर्वत्र हें तुझें रूप । परि गा उग्रत्वाचें रोप ॥ येथें दावाग्नी तो दीप । नेणों कोण्या झोंपडीं ॥ ३ ॥ रवि कर्पे ऐसी आग । किंवा बापा आला राग ॥ तुका राखावा सन्मार्ग । युगायुगीं वाढाया ॥ ४ ॥

॥ ७६७१ ॥ तूं महाराज समजलासी । शुद्ध अक्षरविलासी ॥ ऐसें कळावें जीवासी । मायापाशमुक्तत्वा ॥ १ ॥ आत्मा जगाचा गोविंदा । निधी स्वभावें तूं सदा ॥ तो तूं वाढला एकदा । शाश्वत धर्मपाळजो ॥ २ ॥ जो कां नित्य तूं अव्यय । सर्वकाळ अप्रमेय ॥ तुका वंदितसे पाय । याच भयें वाटतें ॥ ४ ॥

॥ ७६७२ ॥ आदि नाहीं मध्य नाहीं । तेथें क्षय आला कांहीं ॥ अनंतवीर्या तुज तेंही । काय सांगूं किती बोलूं ॥ १ ॥ भुजा अनंत आकृती । मग भासे तो शचीपती । नेत्र सूर्य हा गभस्ती । तव सत्ते ना उडेल ॥ २ ॥ चंद्र मन ह्मणवीतें । नेत्रीं तेज दाखवितें । मुखीं अग्नी अनादी ते । रचना आजी पाहिली ॥ ३ ॥ पाहे तयाचा प्रकाश । जो तूं दिनासी दिनेश ॥ त्रिभुवनेसीं आकाश । तुकयाठायीं दिसेना ॥ ४ ॥

॥ ७६७३ ॥ दिशा विदिशा पाहातां । अंतरिक्ष धांडोळितां ॥ तूं एक दिससी व्यापिता । हे कमलाक्षा कमलेशा ॥ १ ॥ देखोनि हें रूप उग्र । अद्भुत अद्भुता अत्युग्र ॥ लोक भीती गा समग्र । हें माहात्म्य नवलाचें ॥ २ ॥ तुकयाचिया विनंती । प्रगटे पुरवाव्या खंती ॥ तंव सृष्टीच जळती । असतां आयुष्य गोपाळा ॥ ३ ॥

॥ ७६७४ ॥ प्रवेशती हे सुरवृंद । जळीं जळजांसी आनंद ॥ देहीं तुमचिया खेद ॥ हे पावती हें नवल ॥ १ ॥ कृतांजळी कृपाळुवा । तेहीं गणिती तुज देवा ॥ हो कां स्वस्ति ऐशा भावा । महाऋषी बोलती ॥ २ ॥ सिद्धमात्रही जीतुका । ह्मणुन तूतें स्तवी असका ॥ विचित्र हा भासे तुका । पाहोनि झाला विस्मीत ॥ ३ ॥

॥ ७६७५ ॥ आदित्य रुद्रादि वसु जे तदादि । अनवेद विर्धी प्रसिद्ध जे ॥ १ ॥ गंधर्वांचा मेळ यक्षगणपाळ । पाहती सकळ वासुदेवा ॥ २ ॥ विस्मया पावती नेणो आला शांती । भय वागवींती ययास्तव ॥ ३ ॥ मज नवल वाटे होतासी तूं कोठें । एकाएकीं भेटे तुक्या कैसा ॥ ४ ॥

॥ ७६७६ ॥ जीं जीं त्वद्रूप हें मोठेंसें बहु हें । नेत्रें तोंडें पाहे भयानकें ॥ १ ॥ भुजांघ्रीया बहु मांड्या उदर बहु । कराळा ह्या बहु दंष्ट्रा तुझ्या ॥ २ ॥ बहु ज्यांत कांहीं देखोनी हें देहीं । भ्यालें जग हेंहीं मीही तैसा ॥ ३ ॥ सुखा अवर्षणा पडिलें नारायणा । तुका ठेवी प्राणा कोणाठायीं ॥ ४ ॥

॥ ७६७७ ॥ अत्युच्च ह्मणावें उंची ना गणावें । प्रलयाब्धि हेलावे तेजोमय ॥ १ ॥ दिव्यरूप सत्य नव्हे जें असत्य । आमुची अगत्य ऐसी नव्हती ॥ २ ॥ चंडमुख ज्याचें ह्या दीप्त चक्षूचें । भयें आत्मयाचें धैर्य गेलें ॥ ३ ॥ पाहतां ऐसें दुःख सोडून गेलें सुख । व्यापका ओळख तुकयाची ॥ ४ ॥

॥ ७६७८ ॥ दंष्ट्रा ह्या कराळा नृसिंहाची लीळा । तुह्मीं कां गोपाळा धरीलीसे ॥ १ ॥ हिरण्यकशिपु नोहे येथें पार्थ आहे । कृपा करी मोहे पूर्ववत ॥ २ ॥ विकराळ तोंडें काळाग्नीचीं कुंडें । देखिल्याच पडे पाहाणारु ॥ ३ ॥ दिशा नेणें देवा सुख वासुदेवा । प्रसीदात्म भावा तुकयाच्या ॥ ४ ॥

॥ ७६७९ ॥ हे सर्वही जे जे धृतराष्ट्रवीर्य जे । त्याचे सहाय जे आवांतर ॥ १ ॥ अवनीचे पाळ येथें भीष्मकाळ । द्रोणा अतुर्बळ कर्ण तैसा ॥ २ ॥ आतां आमुचेही विश्वाचे जे देहीं । त्यांचे नवल तेंही तुका बोले ॥ ३ ॥

॥ ७६८० ॥ मुखें तुझीं जेथें सत्वर जाति तेथें । भयानक पंथें दंताचीये ॥ १ ॥ विकराळ दंतीं दांतांत श्रीपती । चर्वी तूं वीरकांती ज्यांचीं शीरें ॥ २ ॥ अहो देवराया चाविसी हे वायां । आह्मा चीळसी या तुकया अंगीं ॥ ३ ॥

॥ ७६८१ ॥ नदी जळें जैसी वाहती बळेसी । वेगें सिंधूपासी मिळों येतां ॥ १ ॥ तोही आत्म मुखीं प्रवाहातें शोखी । तैसी ज्वाळामुखीं येथें दीसे ॥ २ ॥ अनेक आननें ज्वाळामय रसने । घेसी तूं स्वादानें रूची देवा ॥ ३ ॥ परंतु आश्चर्य वाटे लोकवर्या ॥ प्रवेशती धैर्या तुका ह्मणे ॥ ४ ॥

७६८२ ॥ किंवा पेटलीया अग्नीमाजी काया । पतंग मराया एकवटे ॥ १ ॥ तैसें लोकमेळ मराया सकळ । निघती केवळ तुझ्या मुखीं ॥ २ ॥ वेगें शस्त्र अस्त्रें रथ साळंकारें । गज उष्ट्र वाजी रे वाहनेंसी ॥ ३ ॥ अपारांचीं येणीं अपार तुझीं खाणी । सांडूं नेणें कणी वृत्त तुका ॥ ४ ॥

॥ ७६८३ ॥ या सर्व लोकांस जेव्हां गिळीतोस । ज्वाळा मुखें त्यांस

चाटीसी तूं ॥ १ ॥ तेव्हां प्रभा तीव्र तुझ्या दर्शनाग्र । मज गमे उग्र सौदामिनी ॥ २ ॥ जग कर्पे ज्यांत व्यापुनी तयांत । देवा तपतात अति उग्रा ॥ ३ ॥ नेणों कैसी भूक लागली अचूक । सोडीली ओळख तुकयाची ॥ ४ ॥

॥ ७६८४ ॥ तूं कोण या उग्रतनू बोले शीघ्र । देई कृपापात्र हितांचेंहें ॥ १ ॥ प्रसन्न तूं होयी तुज वंदन पायीं । करितों हें पाही देवराया ॥ २ ॥ जाणो तूंतें इच्छीं प्रवृत्तीं निरइच्छी । नेणें तुझी कैसी आद्य मूर्ती ॥ ३ ॥ कधीं ना देखीला ऐसा नायकीला । तो तूं प्रगटला तुकया आगें ॥ ४ ॥

॥ ७६८५ ॥ देव बोले आतां महाबाहो पार्था । ऐके रे अन्यथा न मानी तूं ॥ १ ॥ जुनाट लोकांत काळ मी प्रत्यक्ष । मारूं पाहतों साक्ष पाहे माझी ॥ २ ॥ लोकांस या येथें हारूं पाहातसे । न मारिसी कैसें वांचतील ॥ ३ ॥ नरवीर सेनेंमाजी ते असती । झाली यांची शांती धनुर्धरा ॥ ४ ॥ तुज माया येते ते मी सोडीलीसे । आतां काय कैसें जाणो तुका ॥ ५ ॥

॥ ७६८६ ॥ म्हणोनि घे तूं हें ऊठ यश वेगीं । जिंकूनीया भोगी राज्यलक्ष्मी ॥ १ ॥ सिद्धींची समृद्धि आहे तव निढळी । निवटी मंडळी राजयांची ॥ २ ॥ म्यां तो केली शांति पहिलीच यांची । निघे सव्यसाची निमित्ताला ॥ ३ ॥ तुकयासी तूसी भेदना अणुभरे ॥ हीं माझीं उत्तरें हृदयीं लीही ॥ ४ ॥

॥ ७६८७ ॥ अरे हे द्रोण भीष्म आणि हा जयद्रथ । कर्ण महारथ आणि शूर ॥ १ ॥ त्यांस म्यां मारिलें तूं मारि साक्षीला । अदृष्टी राज्याला म्हणूनियां ॥ २ ॥ म्हणी दृष्टी होसी तूं या कर्मीं पार्था । जयश्री सर्वथा वरी तूज ॥ ३ ॥ निमित्ताकारणें घे तूं धनुशर । तुकयाचें अंतर ऐसें आहे ॥ ४ ॥

॥ ७६८८ ॥ कळलें अंतर पीडे भवरोगें । थुंकूनी तो तोंडें अन्न टाकी ॥ १ ॥ देवांचे इतर सेविती पंक्तीसी । तैसा तो रायासी बोलतसे ॥ २ ॥ ऐकोनी केशववाक्यासी अर्जुन । वपु निज मनें घेई जे कां ॥ ३ ॥ कृतांजली किरीटी बोलतो भयभीत । वंदूनि अनंत पुनः पूना ॥ ४ ॥ गद्गद या गिरा तेजें जो आर्दिला । जीवस्वरूपाला तुका नये ॥ ५ ॥

॥ ७६८९ ॥ ऐसें हृषीकेश तुझिया स्थितीतें । पाहूनी हर्षतें त्रिभुवन ॥ १ ॥ अनुरागयुक्त झालें हें पावन । पापीयासी स्नान गंगे जैसें ॥ २ ॥ येथें जे

राक्षस दिशांत लंघीती । भयास पाळीती ह्मणोनीयां ।। ३ ।। वंदीती सद्भावें सिद्धलोक तुज । तुका ह्मणे मौज संतांची हे ।। ४ ।।

॥ ७६९० ॥ न वंदिती कांहे समर्था तुजला । जो थोर विधीला आदि कर्ता ॥ १ ॥ अनंत जो विश्वपटामाजी तंतू । तूं सत असतू अक्षर तूं ॥ २ ॥ शुद्ध ब्रह्म खरें उत्तरें देवाच्या । हृदयीं तुकयाच्या तूंची देवा ॥ ३॥

॥ ७६९१ ॥ विश्वादि तूं सर्व तूं परी पुराण । तूं भूमीया पूर्ण जीवालागीं ॥ १ ॥ विश्व बट होय स्थापत्तां निधान । ज्ञाताही तूं ज्ञानमय यद्रू ॥ २ ॥ त्वाच विश्वरूपें व्यापिलें सकळां । अनंत रूपाला विश्वंभरू ॥ ३ ॥ आज तुका रूपें मज उमजसी । विश्रांति मनासी आली खरी ॥ ४ ॥

॥ ७६९२ ॥ तूंच वायू यम वन्हीही चंद्रमा । देवाचाही आत्मा तूंच देवा ॥ १ ॥ पितामहाचा तूं पिता हें कळलें । तुज सहस्र वेळे नमो नमो ॥ २ ॥ नमो नमो सर्वकाळ तुज मागुती । ऐकीजे हे मती तुकयाची ॥ ३ ॥

॥ ७६९३ ॥ देवा पाठी पोटीं आहे हें कळेना । आहेस नमना करूं तैसें ॥ १ ॥ मागें पुढें वंदूं तव पदालागीं । सर्व तूं यालागीं सर्वां वंदूं ॥ २ ॥ अनंत सामर्थ्य पराक्रमी तूंची । पटीं विश्वयाच्या तंतू तूं गा ॥ ३ ॥ केलें नमन तरी निश्चळ राहवेना । नेणों कारिल वदना भाजी कवळू ॥ ४ ॥ मागें जो हारला कीं कौरवांनी केलें । हें दुसरें आलें तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ७६९४ ॥ जें बोलिलों मी सलगी करोनी । रे यादवा ह्मणूनी कृष्णा सख्या ॥ १ ॥ न जाणतां महिमा देवा पुरुषोत्तमा । चुकलों या कर्मां प्रीतीचीया ॥ २ ॥ शय्यासनीं पंक्तीं चालतां मार्गांत । केला जो हास्यार्थ क्षमा असो ॥ ३ ॥ अपमान कांहीं न कळतां जाहला । तुकया जीवाला शोध ने घे ॥ ४ ॥

॥ ७६९५ ॥ मागें पुढें ही जे मज देवराया । क्षमा अप्रमेया करी सख्या ॥ १ ॥ अच्युता अद्वया नेणोनियां गर्वें । रुसों फुगों अवघे क्षमा असो ॥ २ ॥ चांग तेंच मागो उराउरी देवा । सारथी स्वभावा तूज केलें ॥ ३ ॥ कौरवांचे सभे धाडिलें शिष्टायी । पाहतां अन्यायी कोटि तुका ॥ ४ ॥

॥ ७६९६ ॥ पिता होसी तूं जगाचा । चराचर जडजीवांचा ॥ तूं पूज्य सर्वां गुरू । सर्वां सर्वात्मा साचारू ॥ २ ॥ तुल्य नाहीं कोणी तुज । देवा थोर दीसे मज ॥ ३ ॥ अतुल प्रभाव त्रिलोका । कोठें येवो नेणें तुका ॥ ४ ॥

॥ ७६९७ ॥ ह्मणुन वंदि देवराया । पसरोनि स्वात्म काया ॥ १ ॥ देवदेवा हो प्रसन्न । आह्मी तरी श्रीसंपन्न ॥ २ ॥ पिता सुता क्षमा करी । जेविं सखा सख्या तरी ॥ ३ ॥ प्रिय प्रियाला सद्भावें । तुका क्षमा मागे जीवें ॥ ४ ॥

॥ ७६९८ ॥ हृष्ट झालों हें अपूर्व । रूप देखुनियां सर्व ॥ १ ॥ परंतु या चित्तामाजी । भयें कांपतसें आजी ॥ २ ॥ आतां पूर्वींचा होतास । देह दाखवी आह्मांस ॥ ३ ॥ जरी प्रसन्न व्यापका । तरी संबोखावा तुका ॥ ४ ॥

॥ ७६९९ ॥ करीं गदा सुदर्शन । किरीट मस्तकीं पावन ॥ १ ॥ कृष्णनाथा अनाथाच्या । भेटी याची तों तुमच्या ॥ २ ॥ सोपी चतुर्भुज मूर्ती । जे कवटाळे आह्मा हातीं ॥ ३ ॥ ती दाखवुनी हें झांका । जेथें उमज नेघे तुका ॥ ४ ॥

॥ ७७०० ॥ बोले देव तो साधूचा । महा मेघ गंभीर वाचा ॥ १ ॥ पार्था कृपेनें दावीलें । विश्वरूप म्यां आपुलें ॥ २ ॥ आत्मरूप तेजोमय । अनंत कीं विश्वालय ॥ ३ ॥ नेणे कोणी तूजवीण । तुका ह्मणे माझी खूण ॥ ४ ॥

॥ ७७०१ ॥ यागीं वेदाध्ययन स्थळीं । दानीं सत्कर्म मंडळीं ॥ १ ॥ उग्र तपा हीं पार्था । जगीं शक्य न सर्वथा ॥ २ ॥ पाहाया सरे आणीका । मी इतरा कुरुनायका ॥ ३ ॥ कांहीं नातुडे लोकांही । अरे देखे तुका देहीं ॥ ४ ॥

॥ ७७०२ ॥ या व्यथेनें मूढ मन । न हो होई सावधान ॥ १ ॥ माझें रूप भयंकर । देखून भ्यालें रे अंतर ॥ २ ॥ आतां एकदा मागुती । निर्भय होई वीरपती ॥ ३ ॥ रूप तेंच पाहे पुन्हा । जेथें तुका आला ध्याना ॥ ४ ॥

॥ ७७०३ ॥ संजय बोले कुरुवर्या । वासुदेव कृतकार्या ॥ १ ॥ ऐसें बोलिले अर्जुना । कृष्णरूपें झाला पुन्हा ॥ २ ॥ ग्राहीकाच्याच आवडी । व्यापारीक उकली घडी ॥ २ ॥ नेघे जाणून ठेविली । तुका ह्मणे शांती दिली ॥ ३ ॥

॥ ७७०४ ॥ पार्थ आनंदें नीवाला । देव देखतां सानुला ॥ १ ॥ स्वप्नापरी आदि तेज । क्षणें मावळे सहज ॥ २ ॥ निशीं उदयांत तारा । तेवीं देखे सैन्यभारा ॥ ३ ॥ आपण रथाखालीं उभा । वरी देखे पद्मनाभा ॥ ४ ॥ शंख चक्रादि हत्यारें । चतुर्पाणी रूपगोजिरें ॥ ५ ॥ ठाण लक्षणें

नेटका । दिसे सौम्य टविटका ॥ ६ ॥ हर्षें बोले धनंजय । तुझें देखीयेल्या पाय ॥ ७ ॥ आतां बुद्धि स्मृती आली । वृत्ति राहिली चांगली ॥ ८ ॥ नको पालट घेऊं पुन्हा । तुका ह्मणे जनार्दना ॥ ९ ॥

॥ ७७०५ ॥ भक्त नायकाचे शब्द । ऐकुनि वेद झाला स्तब्ध ॥ १ ॥ चुकी आपणाकुन झाली । ज्यासि जाणीव कळों दील्ही ॥ २ ॥ हातीं आल्या मेरु राई ॥ सत्य बोलतों अन्वयी ॥ ३ ॥ मग ह्मणे गा वेड्या । काई हांसों धनंजया ॥ ४ ॥ अरे अभ्रें वृथा गगन । खरें सांगतों निवडून ॥ ५ ॥ जयापासूनी अपार । होति जाती दश अवतार ॥ ६ ॥ कष्ट भोगिती सुरगण । रूप पाहावया संपूर्ण ॥ ७ ॥ जें कां माझें देखिलें तुवां । नव सुकरी शीव जीवा ॥ ८ ॥ तुका वदला किंचित । झालें त्रिजगतीं विख्यात ॥ ९ ॥

॥ ७७०६ ॥ दानीं तपीं वेदीं नामीं । पूजादिकांचे संभ्रमीं ॥ १ ॥ शक्य पाहाया ये रीतीं । तुवां देखिली जे मूर्ती ॥ २ ॥ बहू निदानींचा ठेवा । तुवां पाहिला पार्थिवा ॥ ३ ॥ सनकादिक जयासाठीं । तुका ह्मणे बहू कष्टी ॥ ४ ॥

॥ ७७०७ ॥ तो मी आत्मैक्य भक्तीनें । शक्य पार्था ये रीतीनें ॥ १ ॥ जाणायास पाहायास । अंतीं गती प्रवेशास ॥ २ ॥ जरी आवडी सगुणीं । चित्त ठेवी रे निर्गुणीं ॥ ३ ॥ तेंच सार्थक तत्वतां । मुका झाला या जाणतां ॥ ४ ॥

॥ ७७०८ ॥ झाला निःसंग मद्भक्त । मी थोर हा धरी हेत ॥ १ ॥ करी मत्क्रिया चोखटी । सर्वभूतीं द्वेष तुटी ॥ २ ॥ तो गा पांडवा पावतो । माझा मज सामावतो ॥ ३ ॥ घंटेपासुनियां नादू । तुका ह्मणे वीसंवादु ॥४॥

॥ ७७०९ ॥ संजय सांगे धृतराष्ट्रा । विश्वरूपीं झाली यात्रा ॥ १ ॥ एकादशाचे मंडळीं । पार्थ देवता गोंधळी ॥ २ ॥ जन्मेजया सांगे कथा । पैं तो वैशंपायन गाथा ॥ ३ ॥ केला समास अध्यावो । तुका उदोकार भावो ॥ ४ ॥

॥ ७७१० ॥ त्याचे पदाच्या पद्धतीं । चाले कवी सिद्धमती ॥ १ ॥ तरीच आधिका उणीवा । देवो रिझाला जाणावा ॥ २ ॥ श्रीगुरु पांडुरंगापायीं । गुरुदास ठेवी डोयी ॥ ३ ॥ येथें तुकया संगती । गीता सांपडली होती ॥४॥

॥ ७७११ ॥ तेणें आशीर्वाद दिला । ना तो कर्णीं मंत्र आला ॥ १ ॥ विश्वरूप पाथदावी । मज निद्रिता चेववी ॥ २ ॥ गेला संशय उडोन । तुका तुष्टला भगवान ॥ ३ ॥

## अध्याय बारावा.

॥ ७७१२ ॥ जाणुनि श्रीपतीचें मन । द्वादश प्रसंगीं अर्जुन ॥ १ ॥ जीवीं विचारी कीं हीत । हेंच असल्या संतत ॥ २ ॥ मग आपण वंचूं नये । देवा दिसे अंतराये ॥ ३ ॥ तरी विश्वरूपाचिया । प्रशंसी तो वाक्यमया ॥ ४ ॥ तरी अव्यक्त चांगलें । किंवा कृष्णरूप भलें ॥ ५ ॥ बरें एकवेळां पुसों । मन तैशा स्थितीं वसो ॥ ६ ॥ ह्मणोनि बोले हर्षमय । अहो यादव-वंशराय ॥ ७ ॥ असे तत्वीं सदा युक्त ॥ भक्त तुज जे भजत ॥ ८ ॥ कोणी निर्गुण मात्रातें । त्यांत उत्तम कोणते ॥ ९ ॥ सांगे महाराज भक्तांच्या । प्रीति ठेवा तुकयाच्या ॥ १० ॥

॥ ७७१३ ॥ बोले भगवान दासा । निज मानसा मद्रूपीं ॥ १ ॥ योजुनियां स्वरूपीं मन । हें साधन निसाचें ॥ २ ॥ आत्म भक्तीनें भजती । जयां चित्तीं ते थोर ॥ ३ ॥ मज संमत पांडवा । तुका वरवा वाटतो ॥ ४ ॥

॥ ७७१४ ॥ नात्या बोलवे क्षरेना । उपासना जरी त्याची ॥ १ ॥ अव्यक्तीं लागे चित्त । सर्व अलिप्त अचिंत्य ॥ २ ॥ जे अढळ शाश्वत । श्रुति संमत जाणवी ॥ ३ ॥ तुका तेथिचा रहिवासी । गुरुदासीं पावला ॥ ४ ॥

॥ ७७१५ ॥ इंद्रियांतें आटोपुन । स्वात्मज्ञानीं चोख जो ॥ १ ॥ समबुद्धीनें सर्वत्र । नेणें क्षुद्र उत्तम ॥ २ ॥ जें हो मातेंच पावती । क्रिया शक्ती सहित ॥ ३ ॥ तुका जैसा सर्वा भूतीं । रत हितीं निर्मळ ॥ ४ ॥

॥ ७७१६ ॥ कष्टी होती ते अधिक । ते मी एक सांगतों ॥ १ ॥ चित्त योजितां अव्यक्तीं । देहासक्ती मुकला ॥ २ ॥ देहीं गती ते अव्यक्त । मना अर्पूनी बुजत ॥ ३ ॥ तुका पावे नाना दुःखें । यास्तव तीखें पावती ॥ ४ ॥

॥ ७७१७ ॥ मातें मानुनीयां थोर । सोडी घोर अन्यत्र ॥ १ ॥ समर्पिती सर्व कर्में । विधी वर्में सूचक ॥ २ ॥ तरी अद्वैत योगेंची । बुद्धि सांची सोडीना ॥ ३ ॥ उपासिती ध्याती मातें ॥ तुकया चित्तें समतोल ॥ ४ ॥

॥ ७७१८ ॥ मजमध्यें ऐसें चित्तें । झेंपावते जे झाले ॥ १ ॥ भवसागरीं सांचा मी । अंतर्यामी तारकू ॥ २ ॥ वेळ न लावितां पार्था । ऊर्ध्वपंथा पाठवी ॥ ३ ॥ तारक होतो तुकयासम । प्राचिन श्रम हारूनी ॥ ४ ॥

॥ ७७१९ ॥ मन मद्रूपीं यालागीं । असलागीं असावें ॥ १ ॥ मला बुद्धींत तूं घाली । हाताखालीं अक्षर ॥ २ ॥ मग तूं मज माजीचरे । चराचरे विरहीतू ॥ ३ ॥ प्रवेशसी ना संशय । गवसे सोय तुकयाची ॥ ४ ॥

॥ ७७२० ॥ स्थिर करूं चित्त आतां । अभ्यासितां येईना ॥ १ ॥ मदंतरी ना प्रवेश । तदुद्देशें सांगतां ॥ २ ॥ अभ्यास मत्प्राप्तीचा । सव्यसाची करि इच्छा ॥ ३ ॥ धनंजया सहजें मग । लागे लाग तुकयाचा ॥ ४ ॥

॥ ७७२१ ॥ न करवे अभ्यासही । ऐसी कांहीं अडचण ॥ १ ॥ मदर्पण करी कर्में । हो का वर्में भलतैसीं ॥ २ ॥ ज्ञानी मत्कर्में करित । प्राक् संचिता जाळित ॥ ३ ॥ तूं या स्थितिसी पावसी । जे तुक्यासी सुलभ गती ॥ ४ ॥

॥ ७७२२ ॥ हेंही नव्हे मन तरी । स्वाधिन करी पुरतें ॥ १ ॥ मदाश्रित सख्या हो रे ॥ मग मोहरे गतलाभु ॥ २ ॥ त्यागीं फळें सर्व कर्मीं । नित्य धर्मीं वासना ॥ ३ ॥ फळ शब्दें सुखस्पृहा । करी तुका आपुला ॥ ४ ॥

॥ ७७२३ ॥ अभ्यासाहुनि विश्वात्मा ! सच्चिदात्मा ओळखे ॥ १ ॥ तैं गा ज्ञान ध्यान त्याला । विशेषाला सृजीतें ॥ २ ॥ श्रेयकर्म सुखत्याग । पावे लाग आमुचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीवन्मुक्त । हरिभक्त चांगले ॥ ४ ॥

॥ ७७२४ ॥ सूत्रचाळकू परेशू । जाणे सर्वात्मा विशेषू ॥ त्याची लागा नुठी द्वेषू । पैं गा तोची निर्वैर ॥ १ ॥ जीवन रंगाच सारिखें । होय तेवीं जो हरीखें ॥ करुणा मैत्र तेवीं देखें । भूतभावी दयेला ॥ २ ॥ मीपण गेलें गा जयाचें । तेथें माझें ऐसे वाचे ॥ ना सिवे तो दुःखाचें । खत-कधीं उकलीना ॥ ३ ॥ तुका वंदी सदा ज्याला । क्षमा धरे सम त्याला ॥ कष्टी देखे जो सुखाला । अनुपम साधु तो ॥ ४ ॥

॥ ७७२५ ॥ धालें मन तोचि तृप्त । योग मार्गांत चाळत ॥ सर्वदा ही अखंडित । जना हित निवेदी ॥ १ ॥ नायकर्ता तो क्षोभेना । उपरोधें दुखाविना । स्थिर चित्ताची वासना । दृढव्रत या नाव ॥ २ ॥ मन बुद्धीस काळवी । दोघां बांधून पाळवी ॥ जो कां आला आमुचे गांवीं । विडा पाउड वाहाया ॥ ३ ॥ तुका विनवितो तया । माझा दास ह्मणोनियां ॥ प्रियसागें सा सुप्रियां । मी गा प्रेमें आलिंगीं ॥ ४ ॥

॥ ७७२६ ॥ बुबुळें भ्रमताच क्षाळी । वातें अंदोळु कमळीं ॥ न क्षो-

भवी भूतावळी । ऐसें ज्याचें वागणें ॥ १ ॥ तो ही लोकापासूनियां । त्रास नेघे गुरुराया ॥ जीव जेवीं पाळीं काया । ऐसा सदा संरक्षी ॥ २ ॥ हर्ष क्रोध दोन्ही नाहीं । त्रास नघे तपदेही ॥ सुलक्षणु ऐसा मही । वरी माझा आवडता ॥ ३ ॥ तुका वंदी त्याचें पद । उगें वर्णी ज्या गोविंद ॥ जनामाजी त्या आनंद । विजनींही राहोनी ॥ ४ ॥

॥ ७७२७ ॥ लोक पूजनीं ना गुंते । शुद्ध वासनाच्या हितें ॥ शाहणा वागवी लोकांनें । हे दक्षता चोखट ॥ १ ॥ गृह दारा सुत सुता । उदासीनु भाग्य येतां ॥ व्यथा न मानी जो चित्ता । भागवतीं कदर्थु ॥ २ ॥ करी न काम फळ पावों । ऐसा न धरीच लाहो ॥ आरंभास सरी पावो । जान्हवीचा कापडी ॥ ३ ॥ असा मद्भक्त तो प्रीय । नाहीं या विषयीं संशय ॥ तुका निजानंदें गाय । तेथें कान मी देतों ॥ ४ ॥

॥ ७७२८ ॥ हर्षद्वेषां विरहीत । वांच्छा शोक न धरीत ॥ टाकी पाउलें शुभांत । अशुभांत त्या तुल्य ॥ १ ॥ आणि मद्भक्त मजला । प्रिय ऐशा गुणीं झाला ॥ एकुलता एक आवडला । वृद्धत्वें बाळकु ॥ २ ॥ कामनास्तव भक्ति बारे । कोट्यावधी करणारे ॥ तुका निष्काम सखा रे । जन्मोजन्मीं दुर्लभ ॥ ३ ॥

॥ ७७२९ ॥ गाई चांग व्याघ्र खोटा । नदी नेणें या बोभाटा ॥ शत्रु मित्रा तैसा होटा । तळीं शब्दु नाळवे ॥ १ ॥ बाळ पीडलें पूजिलें । कल्प नेणें तैसें झालें ॥ शीत उष्णें उबगलें । स्थळ झाड न सोडी ॥ २ ॥ तेंवी सुखदुःखांतरीं । भजे समान श्रीहरी ॥ समर्थां धीर परउपकारी ॥ तुका जैसा निःसंग ॥ ३ ॥

॥ ७७३० ॥ मौनी आरवाचीक नेणे । स्तुति निंदा केली कोणें ॥ तुष्ट लाभ तोष घेणें । जैसा तैसा संतत ॥ १ ॥ निराश्रय भगवंतीं । ज्ञानें केली शुद्ध मती ॥ माझी भक्ती आचरती । मार्ग इतरां कळावया ॥ २ ॥ तो मत्प्रिय किती वाणूं । लटिकें नव्हे तुझी आणू ॥ तुका ह्मणे थोरपणू । देव सांडी आपुलें ॥ ३ ॥

॥ ७७३१ ॥ बोलिल्याच परी जे हें । धर्मामृत जाणून हें ॥ उपासिती सर्वदा हे । आत्म भक्ती चोखटी ॥ १ ॥ श्रद्धाळू माझ्या मार्गीं । मीच थोर ऐशा लागीं ॥ भक्ति वांटी या विभागीं । भक्त जे कां ममप्रिय ॥ २ ॥ तेहीं प्रीत किती सांगूं । आतां आमुचा जिवलगू ॥ त्याची कीर्ती वर्णी चांगू ।

त्यासही मी बोलतों ॥ ३ ॥ नाहीं तरी गीता शास्त्रें । पुढें जयाचें वक्र ॥ अथवा ऐकतील श्रोत्र । कायावाचामनोज्ञें ॥ ४ ॥ ते मी प्रीतीच्या पडिभरें । मुगुटीं वाईजें आदरें ॥ जैसा तुका स्वाधिकारें । तैसा मातें तो प्रीय ॥ ५ ॥

॥ ७७३२ ॥ ऐसें बोलिलें अनंतें । सांगे संजय नृपातें ॥ तैसा जन्मेजयातें । वैशंपायन बोधितु ॥ १ ॥ गीता भीष्मपर्वा आदीं । कीं हे मुक्तिची गवादी ॥ किंवा लडिवाळा खांदी । वाहे समर्थी लौकीकी ॥ २ ॥ येथें अर्जुनाचा प्रश्न । सगुण निर्गूण उपासन ॥ त्यासी बोलिला भगवान । भक्तियोग निर्मळ ॥ ३ ॥ आतां त्रयोदश पुढें । देवो वर्णील सदृढें ॥ जेथें पार्थ प्रश्न गाढे । जडमूढा तारक ॥ ४ ॥ तुकया सद्गुरु संसर्गें । द्वादश अध्याय या मार्गें ॥ आला समाप्तीस अंगें । ऐकिलाच ऐकावा ॥ ५ ॥

## अध्याय तेरावा.

॥ ७७३३ ॥ पूर्वं प्रसंगीं ऐकिलें । भक्ति साकल्य वर्णिलें ॥ तेणें आशंका घेतले । ह्मणोनि प्रश्न हे साहा ॥ १ ॥ देहामाजिल लिगाडें । निवारुनीयां नीवाडें ॥ उघड शुद्धता सांपडे । ऐसें कांहीं कल्पी तूं ॥ २ ॥ अहो तो दादुगा पार्थिव । दांडाइत त्याची ठेव ॥ यास्तव पुसे वासुदेव । वश झाला जाणून ॥ ३ ॥ तेथें तुकयाचे संगतीं । कांहीं प्रसाद पंगती ॥ लाभे ऐसी केली युक्ती । नका घेऊं कंटाळा ॥ ४ ॥

॥ ७७३४ ॥ देव शिरोरत्ना योगिया चिद्रत्ना । ऐकावें जी प्रश्ना दुर्बळाच्या ॥ १ ॥ यया देहामाजीं ठाणेदार राजी । बसले ते आजी चाळवीती ॥ २ ॥ ऐसें कांहीं भासे तरी बोला कैसें । प्रकृतिविलासे आणि पुरुष ॥ ३ ॥ क्षेत्र क्षेत्रज्ञातें कळों हें इच्छितें । ज्ञानही ज्ञेयातें तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ७७३५ ॥ षड्गुणालंकृत भगवान बोलत । लावी बापा चित्त सांगतों गा ॥ १ ॥ शद्धाच्या आशंका अल्पा भेऊं नका । पूतना साविखा जिंकिली म्यां ॥ २ ॥ देह हेंच क्षेत्र ह्मणुनी पवित्र । ह्मणिजे तें विचित्र कुंतीपुत्रा ॥ ३ ॥ यास जो जाणेल क्षेत्रज्ञ होईल । तद्वेत्त्याचा बोल ऐसा तुकीं ॥ ४ ॥

॥ ७७३६ ॥ क्षेत्रज्ञ सर्वांचें जो तो निश्चयाचें । मीच ऐसा वाचें सांगतों गा ॥ १ ॥ भारता तूं जाण न धरी अनुमान । दोहींत जें ज्ञान

ज्यांचें असे ॥ २ ॥ तें ज्ञान माझेंची गोष्टी संमताची । तुका ह्मणे तैंची बोलेलकीं ॥ ३ ॥

॥ ७७३७ ॥ तें क्षेत्र जे जैसें ज्यानें कल्पीलेंसें । विकारी जें जैसें जयास्तव ॥ १ ॥ क्षेत्रज्ञ तो जाण प्रकारेंच खूण । संक्षेप लक्षण सांगू एक ॥ २ ॥ तुका ह्मणे हीत सांगे भगवंत । मायीक साद्यंत तोडावया ॥ ३ ॥

॥ ७७३८ ॥ ऋषीश्वरीं बहुविध स्वानुभवु । वैदीक समूहू वर्णीलेंसे ॥ १ ॥ नाना युक्ती त्यांच्या भाषा गीर्वाणीच्या । सिद्धांत गर्भीच्या ठेवण्या ज्या ॥ २ ॥ वाक्याचे प्रबंध ब्रह्मसूत्र बोध । करूनी विवीध अपादीलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाणी प्राकृत शिराणी । झाली हे काहाणी नका ह्मणूं ॥ ४ ॥

॥ ७७३९ ॥ महाभूतें पांच अहंकार साच । जाणपां ऐसाच बुद्धि भेद ॥ १ ॥ अव्यक्त आठवे हें तकेंची घ्यावें । इंद्रिय मेळावें त्रिपंचक ॥ २ ॥ मन सा अगळें शब्द स्पर्श कळे । पंचक प्रबळें विषयीक ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसें चोवीस या मीसें । मीच जीव भासें वाचाद्वारें ॥ ४ ॥

॥ ७७४० ॥ द्विद्वाश ऐसीं मिळणी संघातासी । क्षेत्र इच्छा तैसी सुखासुखें ॥ १ ॥ द्वेषप्रतीती हे वृत्तीची सत्यहे । धारणा जाण हे तद्विकारू ॥ २ ॥ तुका ह्मणे ऐसें खटलें सांचलेंसें । तेथें चाले कैसें शाहाणीव ॥ ३ ॥

॥ ७७४१ ॥ श्रद्धेचा आधार दंभही साचार । त्याग शांतिसार अवक्रता ॥ १ ॥ भक्ति श्रीगुरूची स्वामीण गुणाची । कीं ज्ञानमार्गीची दिवटी जे ॥ २ ॥ शौच स्थिरत्व गा चित्त निग्रहो गा । आणी वीतरागा विषयांच्या ॥ ३ ॥ वैराग्य असावें निरहंकारभावें । तरी सुख भोगावें तुकयाचें ॥ ४ ॥

॥ ७७४२ ॥ जन्म हा ओखटा अद्वैतीं वसोटा । झाला बारा वाटा उधळी जो ॥ १ ॥ मळमुत्रीं शीणला योनिद्वारें आला । पुढें गंधीयाला योनीची गा ॥ २ ॥ लांचावला हाटीं सोडीना पिनकुटी । मागें पुढें दाटी तीची करी ॥ ३ ॥ ऐसें जन्म जाणें तेणें न्यायें मरणें । जरा रोग घेणें नित्य दुःख ॥ ४ ॥ हा दोष पाहातो तो हा ज्ञानी होतो । मुक्त लीलें जातो तुक्या ऐसा ॥ ५ ॥

॥ ७७४३ ॥ आसक्त झालीया लिंपे न कुरुराया । पुत्र किंवा जाया पडे दृष्टी ॥ १ ॥ चांगलें सदन सामग्री साधन । इष्टत्वादि करून अ-

निष्ठादी ॥ २ ॥ इष्ट- झाल्यावरी फुगा रानधरी । समानची बरी वृत्ति-
राखे ॥ ३ ॥ सखया सुमित्रा पार्था क्षत्रपुत्रा । सर्व दया पत्रा वाची
तुका ॥ ४ ॥

॥ ७७४४ ॥ अद्वैत योगाचें भजन याचें । माझीया रूपाचें लागे-
वेड ॥ १ ॥ भक्तीची सिराणी परी अव्यभिचारिणी । कांता पुण्यखा-
णी नाथसेवे ॥ २ ॥ एकांताची प्रीती जन पदीं खंती । कांटाळा ज्या
चित्तीं राजसभे ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीर्णे धन्य झालें पणें । लोह पालटणें
परीसेंनी ॥ ४ ॥

॥ ७७४५ ॥ अध्यात्मबिचारें बोधा जाणें खरें । परी तें प्रखरें नित्य-
त्व गा ॥ १ ॥ जडीं अजड हें निवडी संदेहें । हाचि अर्थ पाहे निज ज्ञानीं
॥ २ ॥ पार्था हीं लक्षणें शुद्ध ज्ञानी होणें । आमुचें राहणें तया गर्भी ॥ ३ ॥
हाची उलटा योग अज्ञान प्रयोग । तुका ह्मणे सोंग वायां जाये ॥ ४ ॥

॥ ७७४६ ॥ आतां तूं ह्मणशी ज्ञेयवार्त्ता कैसी । ते तूझ्या कर्णासी
लावीतसों ॥ १ ॥ जया ज्ञानें मोक्ष आतुडे प्रत्यक्ष । न उरे सा लक्ष चौ-
ऱ्याशींगा ॥ २ ॥ अनादी अनंत शुद्धाशुद्धि देत । जेथें मुरे चित्त चांच-
ल्यता ॥ ३ ॥ नसत नासत उचित संवाद । तुका ह्मणे भेद निमे जेथें ॥ ४ ॥

॥ ७७४७ ॥ तें दोर अही या देहाचिया ठायां । पाय नेत्र तया शिरें
मुखें ॥ १ ॥ सर्वत्र तें श्रोत्रयुक्तचि पवित्र । व्यापूनि सर्वत्र असे तेजें ॥ २ ॥
वैष्णवांच्या राया ऐके शब्दा यया । श्रुति संमती या मिळे स्मृती ॥ ३ ॥
आतां याच बोलें होईल रूप केलें । द्वय लोकीं भलें मानी तुका ॥ ४ ॥

॥ ७७४८ ॥ इंद्रियें ज्या सत्तें विषयास घेती । किंवा वोळखती खोटें
चांग ॥ १ ॥ विषय इंद्रियें आसक्त झालें जें । परी ना विरजे जयामाजी
॥ २ ॥ जीविती किंवा रे गुण भोगाठायीं । दीपवत पाही साक्षी सदा
॥ ३ ॥ जे कां राया ऐसें निर्गुण ह्मणावें । तुक्यानें जाणावें सर्वाधार ॥ ४ ॥

॥ ७७४९ ॥ ब्रह्म अंतरंग सर्व भूतांलागीं । वायु नभ अंगीं व्याप-
करवें ॥ १ ॥ स्थावर जंगम तेणें न्यायें वागें । शून्य तरी जागे सर्व काल
॥ २ ॥ अतींद्रियपणें आकळे योगींद्रा । दूरी जे कां इंद्रा संनिध तें ॥ ३ ॥
तेथें तो घेणारा निवडीत तुका । जो कां झाला असका निका मुका ॥ ४ ॥

॥ ७७५० ॥ नसोनी वेगळें भूतमात्राठायीं । वागे हे नवाई असंभाव
॥ १ ॥ ऐसा जें सेवीतो वेगळीचीपणें । त्याचें काय कोणें कीजेल-

गा ॥ २ ॥ गिळीतो उगळी सर्व भूतां तोची । परी नाघे त्याची ओळखण ॥ ३ ॥ तोची ज्ञेयरूप तुका ह्मणे पाहे । धरी ही मही हें ऐसें बळ ॥ ४ ॥

॥ ७७५१ ॥ जें कांहीं प्रकाश आत्मा तो तयाचा । कां जे रंग साचा पालटेना ॥ १ ॥ अंधाराचें कुंडें काळोखें निजबीज । असोनी निस्तेज ज्योतिर्मय ॥ २ ॥ ज्ञान ज्ञेय ज्ञान लभ्यतें अर्जुना । सर्व हृद्भुवना सत्ताधार ॥ ३ ॥ अधिष्ठूनी ऊरे जगत्रयांत जें । न लागे अंत जैं वस्तु तुका ॥ ४ ॥

॥ ७७५२ ॥ थोडक्या गोष्टींत तुज आह्मी वदों । पाल्हाळें विवादो ऐसें नसे ॥ १ ॥ क्षेत्र सांगूनीयां ज्ञान दर्शविलें । अज्ञाना वर्णिलें थोडक्यांत ॥ २ ॥ ज्ञेय तरी हेंच क्रमानें बोलीलों । भक्तीनें भुललों तुझ्या सख्या ॥ ३ ॥ मत्स्वरूपा याचे तोची तुक्यासम । जो कां जाणे वर्म याचें वीरा ॥ ४ ॥

॥ ७७५३ ॥ प्रकृती आणीक पुरुष पैं द्वय । ज्या भेदीं अद्वय विकारलें ॥ १ ॥ अनादीच पार्था यांची क्रीडा दीसे । जेथुनी उमसें भूतलोकु ॥ २ ॥ आतां रजसत्वतमादि त्रिगुण । विकार उत्पन्न झाला जी कां ॥ ३ ॥ तुका जीणें झालें प्रकृती पासूनी । प्रकृती असूनी अक्षयी नसें ॥ ४ ॥

॥ ७७५४ ॥ अगळीक दीसे इचे कर्तेपणीं । पुरुषा करणी चित्र दावी ॥ १ ॥ कार्य कीं कारण हेतु प्रकृतीचा । श्रवणें जीवींचा बोधू पाहे ॥ २ ॥ सुखा आणि दुःखाच्या भोग्तृत्वीं जो हेतु ॥ तुका ह्मणे होतु पुरुष स्वयें ॥ ३ ॥

॥ ७७५५ ॥ भोगी प्रकृतीचे गुणांसि पुरुष । तज्जळीं विशेष बिंबूनियां ॥ १ ॥ नानाविध योनी निर्मी तया पार्था । पुरुषास आस्ता भोगी वासु ॥ १ ॥ तुका ह्मणे भूली सेवीली उत्तमें । संगीं तया भ्रमें जाणता हा ॥ ३ ॥

॥ ७७५६ ॥ जो द्रष्टा जाणता भर्त्ता परमात्मा ॥ परेश चिदात्मा अव्यय जो ॥ १ ॥ अर्जुना गा तोची तुजा देहीं भोक्ता । पुरुष अनुरक्ता प्रतिबिंबे ॥ २ ॥ मार्ग दुर्लभ तो जेथें कां सांपडे । तुकयास वेडें जेणें केलें ॥ ३ ॥

॥ ७७५७ ॥ जाणेल कीं जो या पुरूपास कोणी । प्रकृतीसी गुणीं विकाराच्या ॥ १ ॥ प्रपंचीं जरी कां वर्तला तो नर । न बाधे शरीर द्वंद्व

त्याच्या ॥ २ ॥ जान्हवी तटाकीं मेल्या मंगळ जें । ऐशा स्थळीं विरजे आत्मा तुका ॥ ३ ॥

॥ ७७५८ ॥ पाहाती जे योगी निर्विशेष आत्मा । ध्यानीं सच्चिदात्मा लक्षूनीयां ॥ १ ॥ कोणी कितेक ते सांख्याचे विचारें । विश्वात्मा हा बरें न्याहाळीती ॥ २ ॥ योगेंही कर्मेंही ब्रह्म ऐसे कीती । आपुलाले मतीं सारीखे गा ॥ ३ ॥ तुका ह्मणे पथ ज्यास जो आवडे । तेणें केलें उघडें लोकां तैसें ॥ ४ ॥

॥ ७७५९ ॥ आत्मा नेणोनी ही कोणी । ऐकुनि तैसें वाखाणी ॥ १ ॥ अन्य उपासिती भावें । मृत्युसिंधूस तरावें ॥ २ ॥ ते ही तरर श्रवणीं । तुका ह्मणे ज्ञानखाणी ॥ ३ ॥

॥ ७७६० ॥ उपजे जे जे कां प्रतीत । सृष्टिकारण संभूत ॥ १ ॥ चराचरी जेव्हां जेव्हां । न सुटे चित्त अव्हा सव्हा ॥ २ ॥ क्षेत्र क्षेत्रज्ञ संयोगें । द्वैत विंध्ये संप्रयोगें ॥ ३ ॥ जाण भरतर्षभा तें तूं । तुक्या होय पारंगतू ॥ ४ ॥

॥ ७७६१ ॥ सर्वांभूतीं जो समान । नसे ऊंच नीचस्थान ॥ १ ॥ परमेश्वर आहे तया । लावीं मानस अक्षया ॥ २ ॥ अनित्यांत हि नित्या । घेतूं प्रतीतीने सत्या ॥ ३ ॥ तोचि डोळस जो पाहे । तुका व्यापी अंतर्बाह्ये ॥ ४ ॥

॥ ७७६२ ॥ असा पाहे पटींत तूं । देउन दृष्टीला एकांतू ॥ १ ॥ समईश्वरा सर्वत्र । पाहे अ देखणें नेत्र ॥ २ ॥ आत्मघाती न एकतो । देहासह पावन होतां ॥ ३ ॥ त्यावरि जाय मुक्ती पदां । तुकया नलगे आपदा ॥ ४ ॥

॥ ७७६३ ॥ सर्व क्रिया प्रकृतीनें । करिजेताती सुमनें ॥ १ ॥ असें पाहे तो सर्वदा । नेघे पातक आपदा ॥ २ ॥ पैं गा तेव्हां आत्मयाचें । तो पाहतो अकर्त्याचे ॥ ३ ॥ अकर्तृत्वीं कैंचा दोष । जैसा तुकाच निर्दोष ॥ ४ ॥

॥ ७७६४ ॥ तरंगातें देखे जड । परी बुद्धिचा नीवाड ॥ १ ॥ एका चैतन्यसागरीं ॥ बाबुड विकल्प लहरी ॥ २ ॥ विस्तारतो त्यापासुन । गंधी व्यापिती सुमन ॥ ३ ॥ तुका ह्मणे सांडी मावा । ब्रह्म पावतो तेधवां ॥ ४ ॥

॥ ७७६५ ॥ अनादित्वें जो कां असे । निर्गुणत्वें तो विलसे ॥ १ ॥ चिदात्माच ह्मणती ज्यास । अज पाहतां अविनाश ॥ २ ॥ असोनीही सर्व शरीरीं । अकर्त्ताच निर्विकारीं ॥ ३ ॥ नव्हे लिप्त हें नवल । तुकया प्रेमे देतां डोळ ॥ ४ ॥

॥ ७७६६ ॥ नभ लिंपेना कौंतेया । वसवूनी छिन्न ठायीं ॥ १ ॥ सर्व स्थळांत सूक्ष्म जें । स्थळ दोष ना आप जे ॥ २ ॥ सर्वां देहांत सर्वत्र तेवि व्याप्य व्यापी सूत्र ॥ ३ ॥ आत्मा लिप्त तेंव्हां होये । तुका पीडे कलिभयें ॥ ४ ॥

॥ ७७६७ ॥ एक जैसा प्रकाशि तो । सर्वही जग भास्कर तो ॥ १ ॥ सर्व क्षेत्रां तें क्षेत्रज्ञ । प्रकाशित एक सुज्ञ ॥ २ ॥ ऐक भरतवंशोद्भवा । भारतीं तूं भक्तराजा ॥ ३ ॥ भक्तराज तुका कैसा । धन लोभ्या जैसा पैसा ॥ ४ ॥

॥ ७७६८ ॥ हा क्षेत्रज्ञ क्षेत्र भेद । तुज दर्शवूं प्रसाद ॥ १ ॥ ज्ञान दृष्टीनें क्षेत्रही । दाखविलें येथें पाही ॥ २ ॥ भूतसंसार जडत्व । जाणें सोडोंन्या मुक्तत्व ॥ ३ ॥ तुका विनवितो संतां । ऐका मागील संमता ॥ ४ ॥

॥ ७७६९ ॥ झालें प्रसंग पैं तेरा । जनार्दन मुख्य गिरा ॥ १ ॥ येथें ज्ञान आणि जड । क्षेत्र क्षेत्रज्ञ नीवाड ॥ २ ॥ केला पुढें चौदाव्यास । ऐका ठेवूनी मनास ॥ ३ ॥ वदे संजया कुरुपती । श्रोता तुकया संगती ॥ ४ ॥ शेवटीचें अध्येय साहा । ज्ञानकांड असे पाहा ॥ ५ ॥ सुटे पाप ताप बोध । पदप्राप्तीचे अमोघ ॥ ६ ॥ शिष्य शिष्याचा सेवक । माथीं तुकयाचा रंक ॥ ७ ॥

---

## अध्याय चौदावा.

॥ ७७७० ॥ ज्ञानीं उत्तम तें ज्ञान । जें सुभान निर्मळ ॥ १ ॥ पुन्हा सांगेन तें थोर । फोडी घोर भवांध ॥ २ ॥ मुनी सर्व जें जाणुनी । अनुदिनीं तत्पर ॥ ३ ॥ सिद्धी पावले कैवल्य । जिणें साकल्य तुकयाचें ॥ ४ ॥

॥ ७७७१ ॥ माझें याच ज्ञानाश्रयें । महदाश्रयें लागूनी ॥ १ ॥ पावले सारूप्यसिद्धी । दीजे समाधी शुकाची ॥ २ ॥ सृष्टि नव्हती होतांही । स्थिती देहीं विराली ॥ ३ ॥ लयीं व्यथा न पावती । त्यागा मूर्ती तुकयाच्या ॥ ४ ॥

॥ ७७७२ ॥ महत्तत्वात्मक ब्रह्म । तुज सुगम सांगतों ॥ १ ॥ मज हे तुतें जीवत्वीं । मूळ तत्वींचा झाडा ॥ २ ॥ सांत ठेवितांचि दंश । उरे अंश मूळभुत ॥ ३ ॥ विश्व होतसें मी तेंव्हां । तुका जेंव्हां ये जन्मा ॥ ४ ॥

॥ ७७७३ ॥ होती देहोत्पत्ती त्यांच्या । अधिकाराचा मी बाप ॥ १ ॥ जीव वीर्य मी देतों जो । उपजो निपजो रचितवेळें ॥ २ ॥ ब्रह्म महत्तत्त्व माता । कुंतीसुता ऐक रे ॥ ३ ॥ त्याचा भूतांश शोणितें । करी तुक्यातें उत्पन्न ॥ ४ ॥

॥ ७७७४ ॥ गुण भवें प्रकृतीचे । उत्पत्तीचें कारण ॥ १ ॥ सत्त्व आणि रज तम । पुरुषोत्तम सांगतु ॥ २ ॥ देहीं बाधती हे जीवा । वन बोलावा पाण्यानें ॥ ३ ॥ गुणातीत अव्यय जो । अंतीं उमजो तुकया ॥ ४ ॥

॥ ७७७५ ॥ त्यांत निर्दोष सत्व जें । मम तेजें विराजित ॥ १ ॥ प्रकाशक निर्मळत्वें । न कर्तृत्वें अहंकारें ॥ २ ॥ सुखेच्छा विषय ज्ञान । सावधान या विषयीं ॥ ३ ॥ यासी बाधतें या संगें । तुका नलगे मज संगीं ॥ ४ ॥

॥ ७७७६ ॥ विषयप्रीती तोचि रज । धरी काज कामाचें ॥ १ ॥ तृष्णा संग समुद्भवें । मग भवावें मनेच्छा ॥ २ ॥ करवूनी बाधे याला । कष्टी केला जीवात्मा ॥ ३ ॥ कर्में विषय साधनें । तुका मनें विटला ॥ ४ ॥

॥ ७७७७ ॥ तम आत्मत्वे अज्ञानें । गुढ मनें संकल्पू ॥ १ ॥ करी मोहो जड भ्रम । चुके वर्म ज्या साठीं ॥ २ ॥ निद्रा असावधपणीं । होय हानी आयुष्या ॥ ३ ॥ तम बाधतें आळसें । तुका नसे जयांत ॥ ४ ॥

॥ ७७७८ ॥ सत्व प्रबळे सुखांत । ये मुखांत रुचि जेवीं ॥ १ ॥ कर्मांत प्रबळे रज । जेंवी खाज कर्मठा ॥ २ ॥ असावधानिया ज्ञानें । तेणें माने ते तमीं ॥ ३ ॥ तुका नसे रे जयांत । जरी स्वयात रूसली ॥ ४ ॥

॥ ७७७९ ॥ रजतमास मोडोनी । ये वाढूनी सत्वांशु ॥ १ ॥ तम मोडी रज सत्वां । स्व कर्तृत्वा दर्शवी ॥ २ ॥ तम सत्व नुरे जेव्हां । रज तेव्हां विस्तारे ॥ ३ ॥ एका उंची दोनी खांचे । हें तुकयाचे सुशब्दीं ॥ ४ ॥

॥ ७७८० ॥ सर्व देहीं ही इंद्रियीं । रवी जयीं प्रतिबिंब ॥ १ ॥ आणि जेव्हां ज्ञान तेव्हां । जाणे सत्वा वाहाड ॥ २ ॥ तुका म्हणे देव मन । तें आधीन सत्वाच्या ॥ ३ ॥

॥ ७७८१ ॥ आरंभ प्रवृत्ती कर्मी । धरी उर्मी चित्ताची ॥ १ ॥ अशांतता आणि लोभ । देत क्षोभ त्रिलोकीं ॥ २ ॥ विकार आणि स्पृहा । करिती महा कुचेष्टा ॥ ३ ॥ रज वाढतां विलासे । तुकीं पीसें शीरेना ॥ ४ ॥

॥ ७७८२ ॥ कांहीं वर्तेना न सुचे । घर भुलीचें कारण ॥ १ ॥ देह आणि असावध । परि क्रोधा जागतो ॥ २ ॥ नकळे बरें कीं वाईट । पडे कीट आधणीं ॥ ३ ॥ तम जेधवां वाढतें । गुण तुका ते निरूपी ॥ ४ ॥

॥ ७७८३ ॥ जन्म भक्तियोगें रंगे । घडती तीर्थें व्रतें सांगें ॥ सत्वगुण उत्साहा गे । जरी वाढे अर्जुना ॥ १ ॥ त्याच भावें अंतकाळीं । सावधान हृत्कमळीं ॥ स्मरोनियां वनमाळी । देह जरी सोडील ॥ २ ॥ तरी श्रेष्ठ ज्ञाते लोक । जे कां पावती कौतुक ॥ तेथें पावे हा सात्विक । जेवीं बाळक पित्या पैं ॥ ३ ॥ तया प्राप्ति पदा भोगी । कोणी उपद्रविना स्वर्गीं ॥ जरी स्वेच्छा भूमीलागीं । आला तरी तुका तो ॥ ४ ॥

॥ ७७८४ ॥ सोस केला जन्मवरी । रजु पोसिला शरीरीं ॥ शेवटीं तो देहधारी । मरे जरी वासनें ॥ १ ॥ त्यास पुन्हा तोचि हाट । जेथें वसती कर्मठ ॥ तेथें उपजोनी धोपट । मार्ग साधी कायिक ॥ २ ॥ आतां परपीडा परनिंदा । परघातीं जीव सदा ॥ तमोवृद्धींत मानदा । जरी मेला प्राणीया ॥ ३ ॥ तरी जन्मे मूढयोनीं । स्थावर पाथर काननीं ॥ मग तुकया नयनीं । तया न दिसे कल्पांतीं ॥ ४ ॥

॥ ७७८५ ॥ पैंगा निवात कवच रिपु । नगशत्रुजा सुधा वपु ॥ हीही गुणी कुळदीपु । मज सात्विक आवडे ॥ १ ॥ फळ निर्मळ सत्वाला । वेद जें कांहीं बोलिला ॥ पुण्य मार्ग उजळीला । दुजा भानू होऊनी ॥ २ ॥ रजाचें फळ तें दुःख । जरी रुची नेघे सुख । इंद्रिय विषयीं असुख । आठवूनी मग रडे ॥ ३ ॥ उघडे तमाचें खापर । अज्ञानाचा शिरोभार ॥ तेंचि फळ ज्या अपार । बोधी तुका नायके ॥ ४ ॥

॥ ७७८६ ॥ सत्वगुणें ज्ञान वाढे । वेदशास्त्र कळे पुढें ॥ बुद्धि मोहेना सहढें । जरी मुढें वेष्टीला ॥ १ ॥ रजोगुण वृद्धि अंत ॥ पैंगा इंद्रियें आघात ॥ पाठीं वाजतां धांवत । अविवेक तरुच्छायें ॥ २ ॥ आतां तमाचें सार्थक । मूळ असावा धावक ॥ पुढें अज्ञान पाक । पाहुन चाले त्या पाठीं ॥ ३ ॥ मुर्खपणाचें वेतन । प्राण सांडी तें घेऊन ॥ सहज तुकया समान । करूं ह्मणतां नष्टले ॥ ४ ॥

॥ ७७८७ ॥ सत्वगुणें नर वैदुर्या । ऊर्ध्वगती साधुवर्या ॥ ज्यास मार्ग देतो सूर्या । मग यम तो कीती ॥ १ ॥ आतां येथें भूलोकांत । देह धरणें अंतवंत ॥ येथें उपडे पडे जीवित । मेघातळीं रजाचें ॥ २ ॥ आतां

तिसरा जो तमु । किंवा श्मशानीचा धूप ॥ ज्याचा क्रोध वाहे यमू । नीच वृत्ती पाहूनी ॥ ३ ॥ तामस लिंगा अधोगती । कधीं न पवे सुगती ॥ नये तुकया संगती । फिरे जरी चौऱ्याशीं ॥ ४ ॥

॥ ७७८८ ॥ कर्त्ता कार्य कारणाचा । गुणावीण ठाव त्याचा ॥ नसे ऐसी माझी वाचा । सत्य मानी अर्जुना ॥ १ ॥ दृश्य दर्शनांत द्रष्टा । आहे त्रिपुटी प्रतिष्ठा ॥ पाहे ऐसे जरी श्रेष्ठा । नलगे कांहीं पुसणें ॥ २ ॥ स्वात्मा गुणातीत पाहे । तोच पावे मद्रूप हें ॥ येथें तुका निःसंदेहे । गुणातीत लेखावा ॥ ३ ॥

॥ ७७८९ ॥ उल्लंघुनी गुणवाटा । स्थिती अन्यत्र सुभटा ॥ संस्कार तनू पटा । माजि रंग जो दिसे ॥ १ ॥ जन्म मृत्यु जरा दुःखा । जो वेगळा स्वात्मसुखा ॥ भोगी मुक्तिचीया सुखा । चिरंतन एकाग्र ॥ २ ॥ ऐसा देव वदे वाणी । येरें परिसुनी श्रवणीं ॥ उल्हासला गांडिवपाणी । पुसे आवडी धरुनीयां ॥ ३ ॥ सत्य सुख गुणपर । काय तयाचें अंतर ॥ तुका वदला सादर । श्रोतीं चित्त ठेवावें ॥ ४ ॥

॥ ७७९० ॥ वदे अर्जुन गोकुळपाळा । ऐक वसुदेवाच्या बाळा ॥ कोठें या चिन्हाचा मेळा । जो वोतला संतत ॥ १ ॥ त्रिगुणांस उल्लंघून । तेव्हां तें क्रमी साधन ॥ बोले हरी सावधान । असा आचार तो कैसा ॥ २ ॥ यासी लंघुनी वर्ततो । स्थितिं कोणसा नांदतो ॥ तुका प्रपंचीं वागतो । कैसा वदसी निराळा ॥ ३ ॥

॥ ७७९१ ॥ बोले मेघवर्ण कांती । मेघ गंभीर गिरेप्रती ॥ ऐके मेघवाहन मूर्ती । श्रोत्र मेघ चातक ॥ १ ॥ जेणें प्रकाशे प्रवृत्ती । मोह सत्वादिकां स्थिती ॥ जीं लक्षणें धरी मती । प्रवृत्तिकर्मी न द्वेष ॥ २ ॥ निवृत्तीतें अपेक्षिना । ऐसी निश्चळ कल्पना ॥ तुका ह्मणे मग अर्जुना । पुन्हा बोले गोविंदु ॥ ३ ॥

॥ ७७९२ ॥ त्रिभुवनवैभवास । घेउनि शंकरगृहास ॥ अपूर्व आला तरी त्रास । तो उदास या नांवें ॥ १ ॥ त्रितापांकित पीडे । ऋतु देतां नभाकडे ॥ नये चांचल्य ल्यापडे । जो कां झाला निश्चळु ॥ २ ॥ गुण वर्तती हे ऐसे । हेकें न धरी मानसें ॥ स्वतां कर्त्तव्यता नसे । कांहीं न करी यालागीं ॥ ३ ॥ कडकडाटें गेला वारा । रुख न वचे सांडुनि थारा ॥ किंवा मेरू पांडुकुमारा । काय लेखी तो तुका ॥ ४ ॥

॥ ७७९३ ॥ न प्रिय आलीया संतोषे । अप्रियांत नये रोषे ॥ सुखदुःखादि विशेषें । एक सुखें जो सेवी ॥ १ ॥ कोणी निंदिला वंदीला । प्राप्तद् ऐकेना तयाला ॥ कोठें रुसला फुगला । ऐसें गुण जो नेघे ॥ २ ॥ स्वात्मनिष्ठेतें न सोडी । ध्रुव तपा त्रिदश कोडी ॥ छळितो-भक्ति न तो सोडी । मधुवनीं मनोहर ॥ ३ ॥ भेंडा धोंडा कीं सुवर्ण । परिक्षूं नेणें वर्णावर्ण ॥ तो गा झाला जरी अव्रण । तुका तरी मत्प्रिय ॥ ४ ॥

॥ ७७९४ ॥ मान अपमानीं शत्रु सन्निधानीं । मित्राच्या भुवनीं सरिखा जो ॥ १ ॥ द्वय पक्षीं सम तपें भानुत्तम । तैसा न विषम झाला कोणा ॥ २ ॥ आरंभ सर्व ही टाकीतो न पाही । मन निःसंदेही एक विध ॥ ३ ॥ पार्था गुणातीत तोचि बोलिजेत । ऐसी जेथें ख्यात तुक्यासम ॥ ४ ॥ ॥

॥ ७७९५ ॥ मातें अव्यभिचारें सेवी जो आदरें । पतिव्रता सरे पतीसवें ॥ १ ॥ भक्तीयोगें पूर्ण उपासीतो खुण । सांगतों तुज गुण उल्लंघीतो ॥ २ ॥ ब्रह्मत्वास योग्य झाला महाभाग्य । होईल आरोग्य शनैःशनैः ॥ ३ ॥ हें ही नको ज्याला रसरूपें वोतला । वैद्य तो गांजला तुकारामु ॥ ४ ॥

॥ ७७९६ ॥ ऐके सव्यसाची नित्य जें वेदांची । साक्षीनें मोक्षाची संपदा गा ॥ १ ॥ धर्म जो आपुला चहूंवर्णी आला । याचीया पावला शाश्वतासी ॥ २ ॥ एकांतसुखास मी जगन्निवास । प्रतिष्ठा तयास केवळ गा ॥ ३ ॥ मीच होय ऐसें धरावें मानसें । तुका अनायासें उद्धरला ॥ ४ ॥

॥ ७७९७ ॥ ऐसी हे सुगीता साधकाची माता । मज वाटे दुहिता श्रीहरींची ॥ १ ॥ सुभद्रेहोनीयां अधिका मान या । कां जे व्यापूनीयां उरली असे ॥ २ ॥ तिचा अभिमन्यू इचा बोध मन्यु । पतन जघन्यू मानी हरी ॥ ३ ॥ भाग्यांचा सपूर पांडुजा चतुर । निर्वेदी असुर कुळकाळा ॥ ४ ॥ झाले अध्येय चवदा गुणातीत वादा । सांगूनी संवादा नेमी तुका ॥ ५ ॥

---

## अध्याय पंधरावा.

॥ ७७९८ ॥ नमुनी साष्टांगीं कुळदेवी अष्टांगी । लोभू ते कष्टांगी करूं रिघे ॥ १ ॥ पंधरावे प्रसंगीं पार्थ जीवसंगी । आशंका प्रसंगीं उद्धव-

ली ॥ २ ॥ प्रपंचु हे तीखें दिसे कां वरुखें । वोरकीस वीखें ग्रासील हें ॥ ३ ॥ जाणूनी कल्पना नसावी अर्जुना । वृक्षाची भावना निवेदीतो ॥ ४ ॥ पुढें क्षराक्षरू उत्तम संचारू । सांगे भामावरू रखुमाईचा ॥ ५ ॥

॥ ७७९९ ॥ दितीज भंजनु कुटीला गंजनु । बोले निरंजनु योगेश्वर ॥ १ ॥ ऊर्ध्व मुळ ब्रह्मी माया शाखा क्रमी । देहो अधो ऊर्मी जीवीताची ॥ २ ॥ विश्वाश्वत्थु ह्मणे अश्वत्थ देखणे । श्रुतीपत्रें जाणे ऐसा कोणी ॥ ३ ॥ तोचि वेदविद गा भासे जीवलगा । येथें पावेल गा तुका स्वयें ॥ ४ ॥

॥ ७८०० ॥ जीवेश्वरीं हेत देहगा आश्रित । त्रिगुणें प्रवृद्धांत तेही ऐका ॥ १ ॥ उपशाखोंबळें अल्प अंतराळें । पृथक तनूमूळें लिंगदेहीं ॥ २ ॥ जीवीं ही कर्मांचे जया बंध त्याचे । मनुष्यदेहाचे बेचाड गा ॥ ३ ॥ हाची ब्रह्मरज्जु जगसर्प तेजु । सांगे भक्तराजु तुकयाचा ॥ ४ ॥

॥ ७८०१ ॥ आतां आदि अंत नसे ज्या निश्चित । ह्मणावा शाश्वत तेही नाहीं ॥ १ ॥ पाहतां जयाची मूळादि तत्वाची । वाचा स्वयंभूची खुंटली गा ॥ २ ॥ प्रबळें विचित्र दिसे दीर्घ सूत्र । विषयीं अन्यत्र पोसला जो ॥ ३ ॥ ज्ञणी भयें चिंता धरिसी पांडुसूता । उत्सेदन आतां सांगों तूज ॥ ४ ॥ निष्काम जो दांड निःसंगाचे खांड । गुरुसेवा अखंड धैर्यवंतु ॥ ५ ॥ तो या भववृक्षा निवटी हे साक्षा । वदे देवो दक्षा हता मित्रु ॥ ६ ॥ तुका ह्मणे केली पायवाट भली । जड मूढें तरलीं कासें-लागीं ॥ ७ ॥

॥ ७८०२ ॥ तें तों त्याचमाजी पद धुंडी आजी । कीं गेल्या ज्या माजी परतेना ॥ १ ॥ लोकीं कीं पावन पुरुषा सनातन । आद्य जें कां स्थान अव्ययाचें ॥ २ ॥ प्रवृत्ती जेथुनी नित नवी होऊनी । विस्तार पावूनी रूढली गा ॥ ३ ॥ अनघा ते हेंची जाण सव्यसाचीं । तुका वैराग्याची सेल ठेवी ॥ ४ ॥

॥ ७८०३ ॥ नाहीं श्लाघ्य काम मोह ना संगम । दोषाचा आगम पंथ टाकी ॥ १ ॥ निष्काम जो स्वात्मविचार संभ्रम । शेष उरे नाम रूप नाहीं ॥ २ ॥ द्वंद्वाशी सुटला सुखदुःख संज्ञेला । ते या नित्य पदाला जाणती गा ॥ ३ ॥ अभिज्ञ अक्षय ह्मणावें तयास । तुका ह्मणे यास अधिकारु ॥ ४ ॥

॥ ७८०४ ॥ त्या पदा शशांक सूर्य हुताशन । प्रकाशिती आन नव्हे
कोणी ॥ १ ॥ एकदा गेलीया खुंटे वेरझार । पुन्हा न संसार दृष्टी पुढें
॥ २॥ माझें तें सदन पावन परम । तुकयाचें धाम तेंची खरें ॥ ३ ॥
॥ ७८०५ ॥ माझा प्रतिबिंब अंश जाण पार्था । खरी तूज कथा नि-
वेदितों ॥ १ ॥ झालों जीव जगीं जडा चेतना जे । होय आणी गाजे अहंकार
॥ २ ॥ मना पंचेंद्रिया अन्यासी पाहतां । प्रकृती चाळिता झालों मीच
॥ ३ ॥ तुकयाचें मनीं अनुभव जो कां । तोची सांगू नीका कानू देई ॥ ४ ॥
॥ ७८०६ ॥ ययासवें घेतां शरीरातें आत्मा । निघे परमात्मा ईश
जेव्हां ॥ १ ॥ त्यातें घेवोनियां जातो कैशा रीती । पवन गंधाप्रती तैसा हाही
॥ २ ॥ तुका ह्मणे खेळ खेळुनी वेगळा । अगम्य ते कळा जाणे कोण ॥ ३ ॥
॥ ७८०७ ॥ श्रोत्र डोळे कांती जीभ नाक पांच । ज्ञान दृष्टी पंच इं-
द्रियेंही ॥ १ ॥ अधिष्ठूनि मना तेही एकवट ॥ सेवितां संकट विषय हा
॥ २ ॥ भोक्ता तरी असे असोनी दिसेना । आश्चर्य हें मना तुकयाच्या ॥ ३ ॥
॥ ७८०८ ॥ निघे कैसा पाहे असें कसा हेंहो । लक्षीता संदेहो गमे वी-
रा ॥ १ ॥ कैसा भोग भोगी कैसा गुणीं वागे । अज्ञाना वाउगें वाटे सारें
॥ २ ॥ ज्ञानदृष्टि ज्याची ढोळस तो जनीं । पाहे जो हरोनी माया दृश्य
॥ ३ ॥ तुकया संगींचा विरळा लक्षांत । असेल जाणत ईश्वराशी ॥ ४ ॥
॥ ७८०९ ॥ प्रयत्नशीळ कीं योगिये चांगला । देखती येयाला अ-
भ्यंतरीं ॥ १ ॥ अशुद्ध जे देहीं कर्मी अमंगळ । यत्नीं ही विटाळ जया
नरा ॥ २ ॥ स्वतां नसे ज्ञान सांगीतलें नेघे । अबुद्ध अवघें स्वैर वागे ॥
॥ ३ ॥ न देखती ऐसें ईश्वरीं गौरव । भोगीती रौरव तुका ह्मणे ॥ ४ ॥
॥ ७८१० ॥ जेणें तपे भानू प्रकाशी त्रिजग । शीतळत्वें चांग चंद्रमा-
ही ॥ १ ॥ दोनी नसलीया पडे जें अंधारू । तेव्हां दे आधारू पावक जो
॥ २ ॥ ययावीण जनीं जो गुप्त प्रकाश । हृदयांचे कोश उजळीता ॥ ३ ॥
विषया उजळी माझी तेज जोतु । जेथें मिळे अंतु तुका साधु ॥ ४ ॥
॥ ७८११ ॥ धरितों शक्तीनें भूतें सपर्वत । वृक्ष नदी पंथ सरोनद
॥ १ ॥ प्रवेशोनी धरेमाजी मी सखया । मढळें शेषा या आगळीक ॥ २ ॥
उष्णें कपेंती सा औषधींचे भार । निशि निशाकर शांतवीतो ॥ ३ ॥ र-
सात्मक मीच ह्मणूनी सखया । रोग जाय लया व्याधिग्रस्त ॥ ४ ॥ नाना
धातु क्रिया दिव्य रसायन । साद्य घेती गूण तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ७८१२ ॥ प्राण्यांचे शरीरीं मीच वैश्वानर । होउनी आहार पचवीतों ॥ १ ॥ प्राणापान द्वय भाते लाऊनीयां । भस्मची अन्ना या चतुर्विधा ॥ २ ॥ जठरीं अन्न पचे पाहे माझी लीळा । परी नलगे बाळा ढका येथें ॥ ३ ॥ गर्भीण त्रिकाळ जेवीं डोहळयाचें । नवल देवाचें तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ७८१३ ॥ सर्वांचीया मी हृदयीं प्रविष्ट । असें तरी स्पष्ट जाणी बघे ॥ १ ॥ देतों श्रुति स्मृती बोध विस्मृतीला । इष्ट मी ज्ञेयाला श्रुतिगम्य ॥ २ ॥ सर्व संतां कळें वेदांत कृद्व्यास । वेदवेत्ता ज्यास मानी विश्व ॥ ३ ॥ तुकया वरदें कवी स्मृती वेळीं । कैसी पाल्हावळी संध्याकाळीं ॥ ४ ॥

॥ ७८१४ ॥ लोकीं जैसे रात्रंदिन नभ धरा । तैसे हे अवधारा द्विपें पुरुष ॥ १ ॥ क्षर आणी दुजा अक्षर म्हणुनी । ओळखे निदानी जीव शीव ॥ २ ॥ क्षरतो सर्व हीं भूतें गा चतुरा ॥ कूटस्थ अक्षरा अंश वदे ॥ ॥ ३ ॥ ययाहोनी भिन्न ऐकावें सुजणा । तुकया चरणा लागतसे ॥ ४ ॥

॥ ७८१५ ॥ तो अन्य पुरुषोत्तम । पार न जाणे आगम ॥ १ ॥ बिंब सर्वात्मा बोलीला । पातंजळीं निश्चय केला ॥ २ ॥ प्रवेशुनी जो जीवत्वें । जीवा सांभाळी ईशत्वें ॥ ३ ॥ ऐसें थोडक्यांत बुझे । तुका केवळ दिन माझें ॥ ४ ॥

॥ ७८१६ ॥ क्षरातीत मी यालागीं । तुज कळावें प्रसंगीं ॥ १ ॥ उत्तम गा अक्षराहून । माझें अगाध हें ज्ञान ॥ २ ॥ लोकीं वेदीं ही यास्तव । आहे आमुचा चि स्तव ॥ ३ ॥ पुरुषीं उत्तम विख्यात । जाणे तुकया संमत ॥ ४ ॥

॥ ७८१७ ॥ असें जाणे माला सूज्ञ । त्यासी ह्मणावें सर्वज्ञ ॥ १ ॥ येर मूढ शिखामणि । काय चाटावी करणी ॥ २ ॥ जो मला पुरुषोत्तमा । मीच क्षराक्षरू नामा ॥ ३ ॥ मज भजे सर्व भावें । जैसा तुका लागे सेवे ॥ ४ ॥

॥ ७८१८ ॥ ऐसें शास्त्र बांधीयलें । सख्या गुह्य सांगीतलें ॥ १ ॥ बुद्धीवंत जाणेल जो । तोच येईल आह्मा भजों ॥ २ ॥ कृतकृत्य होय तो । तुका ह्मणे यम भीतो ॥ ३ ॥

॥ ७८१९ ॥ झाले पंधरा अध्याय । बोध जेथें चतुष्पाय ॥ १ ॥ पुढें षोडशीं संयुक्त । चंद्र प्रगटेल विरक्त ॥ २ ॥ निवती श्रोते वक्ते प-

नीं । मोक्ष ठेविला नीदानीं ॥ ३ ॥ पाहों तुकयाच्या सर्वे । कळेवर-त्यक्त गर्वे ॥ ४ ॥

## अध्याय सोळावा.

॥ ७८२० ॥ ऐके गुणवंता किरीटी । दैवें फळ दिल्या हाटीं ॥ १ ॥ गुण उत्तम धरिजे । सत्वशुद्धि भय त्यागीजे ॥ २ ॥ ज्ञानयांत थोरपणें । दान दम याग करणें ॥ ३ ॥ तप शास्त्र वांकुडा । तोचि तुकया सौंगडा ॥ ४ ॥

॥ ७८२१ ॥ सत्य राग न अहिंसा । त्याग शांतिचा भरंवसा ॥ १ ॥ अपैशून्य मनीं लाज । दया भूतीं मृदु काज ॥ २ ॥ स्थैर्य निस्पृह लक्षणें । मी ओवाळी पंचप्राणें ॥ ३ ॥ धन्य माउली तुकयाची । कुसी सुफळ पुण्याची ॥ ४ ॥

॥ ७८२२ ॥ न ज्या श्लाघ्य परद्रोहो । नसणें धारणा उत्साहो ॥ १ ॥ क्षमा शुद्धता पैं तेज । हें होती गा दैवें आज ॥ २ ॥ संपत्तिचा तोची नर । मिरवी भूषणीं शरीर ॥ ३ ॥ दैवी देवाची ह्मणावी । वस्ती तुकयाची गावीं ॥ ४ ॥

॥ ७८२३ ॥ आतां दंभ दर्पगुणें । वसवी अहंतेचें ठाणें ॥ १ ॥ क्रोध क्रूर अवक्रता । आसुरी संपदा अहिता ॥ २ ॥ ज्यास होती तो पावला । कांदा जेवीं दुर्गंधीला ॥ ३ ॥ सजी कस्तुरीचें आळें । तुका ह्मणे मस्ती-बळें ॥ ४ ॥

॥ ७८२४ ॥ दैवी संपदा मोक्षार्थ । पहिला सांगितला अर्थ ॥ १ ॥ भवबंधार्थ आसुरी । जे हे वर्णितों दूसरी ॥ २ ॥ शोक न करी पांडवा । वरू आलीयास देवां ॥ ३ ॥ तूं गा दैवी संपत्तिचा । भाव दर्पण तुकयाचा ॥ ४ ॥

॥ ७८२५ ॥ द्विधा उद्भव भूतांचा । दैव आणि आसुरांचा ॥ १ ॥ विस्तारें वदलों दैव । सुचिन्हाचा प्रादुर्भाव ॥ २ ॥ आतां आसुरा आइक । मन देउनी नावेक ॥ ३ ॥ जेथें दुश्चिन्हांचा मेळ । तुकया न मानी तो खेळ ॥ ४ ॥

॥ ७८२६ ॥ कामप्रवृत्ति धर्मार्थी । कीं मोक्षार्थी निष्काम ॥ १ ॥ नेणतीच द्वय मार्गा । विषय वर्गावर पडे ॥ २ ॥ शौच आचार तो नाहीं ।

जैसे महीषी ही रेडे ॥ ३ ॥ असुरां त्यां नसे सत्य । तुकया गत मग कैंची ॥ ४ ॥

॥ ७८२७ ॥ ईशावीण वर्णितातीं । विश्वोत्पत्ती कामानें ॥ १ ॥ देव ह्मणीजे कृत्रिम । सर्व क्रम आपुला ॥ २ ॥ विश्वा कैसेनि उद्योग । हा संयोग स्त्री नरा ॥ ३ ॥ अहो मैथुनावांचून । कैं दिसून ये तुका ॥ ४ ॥

॥ ७८२८ ॥ दृष्टि ज्यांची प्रत्यक्षी हे । न जो पाहे सद्वाक्य ॥ १ ॥ अल्पबुद्धि जो भ्रष्टधी । कोणें कधीं उद्धरे ॥ २ ॥ लोक घातीं क्रूरकर्मी । पाहे उर्मी बळाची ॥ ३ ॥ दुष्ट चार्वाक वर्तता । नेणे संता तुकया ॥ ४ ॥

॥ ७८२९ ॥ दंभ श्लाघा मदें मस्त । अंगें सुस्त बोकड ॥ १ ॥ कामसिंधुंत बुडाला । जो उडाला मर्यादे ॥ २ ॥ मोहे घेऊनी दुर्बुद्धि । हुंगी गंधी योनीची ॥ ३ ॥ व्रतीं शुचीं वर्तती । तुकयाप्रती दे त्रासू ॥ ४ ॥

॥ ७८३० ॥ मरणादि चिंता नाना । आठवीना रोगासी ॥ १ ॥ भय न धरी यमाचें । तो रामाचें काय लागे ॥ २ ॥ भोग पुरुषार्थ भोगी । देह भंगीं आपण ॥ ३ ॥ प्रत्यक्षींच निश्चय जया । तो तुकया न पाहे ॥ ४ ॥

॥ ७८३१ ॥ आशापाश ते निबद्ध । दे विरुद्ध श्रीपादा ॥ १ ॥ कामक्रोधासी आश्रित । कीं मिश्रित लोभांगीं ॥ २ ॥ इह लोकींच्या भोगार्था । परमार्था नायके ॥ ३ ॥ धन अन्याय संग्रह । तुका ग्रहरूप त्या ॥ ४ ॥

॥ ७८३२ ॥ मेळविलें आजी म्यां हें । हिशोब पाहे दफ्तरीं ॥ १ ॥ मनोरथ हा होणार । कीं सोनार दे डांक ॥ २ ॥ मज आहे हें बोलती । पैं कोलती पिशाची ॥ ३ ॥ पुन्हा धन दैवें मीळे । तुकया खळें गांजावें ॥ ४ ॥

॥ ७८३३ ॥ आज वैरि हा मारिला । आणिकाला मारीन ॥ १ ॥ समर्थ तो मीच भोक्ता । ऐसा वक्ता अस्मादि ॥ २ ॥ बळें मीच सिद्ध मीच गर्वें चिंच वांकली ॥ ३ ॥ तुका पाहिला तुकून । मी सधन सुखाचा ॥ ४ ॥

॥ ७८३४ ॥ मला दूत समृद्ध मी । जग न मी न पाहे ॥ १ ॥ मज सारिखा कोण हो । भरी होन हो हुंडीचे ॥ २ ॥ मातें भजे त्यास सुखें । मी असंख्य देणारा ॥ ३ ॥ वदती दैत्य हे श्रौत कीं । कुबेर तुकीं तुकेना ॥ ४ ॥

॥ ७८३५ ॥ चित्तीं स्वर्गादिका भ्रांती । ते महंती कोरडी ॥ १ ॥ मोहजाळेंच वेष्टिलें । प्रतिष्ठिलें स्त्रीद्वंदीं ॥ २ ॥ न पुरेच काम देहीं । मग विदेही जैं होती ॥ ३ ॥ तेव्हां पडती नरकांत । तुकया भ्रांत लागेना ॥ ४ ॥

॥ ७८३६ ॥ देहीं धनें मानें मदें । तंतु आल्हादे गर्विष्ठ ॥ १ ॥ पोसले जैसे वृक । दिनाविक मांसानी ॥ २ ॥ यज्ञ यजती नावांचे । कीं दंभाचे ढांगोरे ॥ ३ ॥ विधिपूर्वक चुकले । ते मुकले तुकयासी ॥ ४ ॥

॥ ७८३७ ॥ शरीरीं अहंकार पेटे । वन्ही न पाहे वसोटे ॥ बळें शुक्र-वन्ही झटे । गर्व दावी तेजाचा ॥ १ ॥ काम कापुर मिळवणी । क्रोध गंध-काची खाणी ॥ झाला श्रित घृतकर्णी । उरों नेदी चाटितु ॥ २ ॥ ममअंशें जग झालें । ऐसें ज्यास उमजलें ॥ इहीं तयास भर्जीलें । ऐसा गा पुढां द्वेषिती ॥ ३ ॥ ज्वाळा निंदेची खढतर । पोळी साधूचें जिव्हार ॥ तेथें तुकायाचा थार । आहे आहे नाहीं नाहीं ॥ ४ ॥

॥ ७८३८ ॥ परताप मत्सेवका । पाहोन आकांत या लोका ॥ मेघ मी वोळे त्या पावका । इस्तोदका चित्रेंसी ॥ १ ॥ माझी क्रूरपणाची तीख नभीं चमके लखलख ॥ तेव्हां पडे काळें मुख । जें गुंडाळे धुवारे ॥ २ ॥ न-राधमाची विभूती । आसुरी पोटीं धुंधुवाती ॥ पडे तेथें उद्भवती । सदा काळ कोळसे ॥ ३ ॥ दुष्ट योनी पुनःपुना । अन्य मार्गु नेणे सीन्हा ॥ कां जे तुकयाचा तान्हा । खळें आगळा गांजीला ॥ ४ ॥

॥ ७८३९ ॥ आसुरी योनीं मूढ । जन्मोजन्मीं पावे दृढ ॥ तें ही न ठेवीं मी गूढ । येथें उघड सांगतों ॥ १ ॥ भील कावळा कीं बोका । कर्म-ठही सेर टोलका ॥ मुंगळा मातंग मंडुका । कंटक रूख पाषाण ॥ २ ॥ गीध व्याघ्र क्रोड पीसा । योनी भोगुनियां अशा ॥ मग यमदंडें त्रासा । पावे पडे रौरवीं ॥ ३ ॥ जेथें अंत न लगे रवी । वायु खुंटे त्या आथावी ॥ पडे विसर मग जीवीं । झाला पुरा तुकयाचा ॥ ४ ॥

॥ ७८४० ॥ जात्रया नरक कूपीं । तीन द्वारें हीं साक्षेपीं ॥ हातीं ला-गलीया पापी । बळें देती ढकलूनी ॥ १ ॥ आत्मघातक यास्तव । आह्मी ठेवूं यांचें नांव ॥ कां कीं न चले उपाव । येथें कोटी साधनीं ॥ २ ॥ तरी काम क्रोध लोभ । तीन द्वारें हीं स्वयंभ ॥ ज्याचा भुवनत्रयीं क्षोभ । कांपे अवघा भूगोळ ॥ ३ ॥ तस्मात् शाहाणा तूं होसी । तरी त्यागी या तीघां-सी ॥ मग शुद्ध मार्गा जासी । जैसा तुका वैकुंठा ॥ ४ ॥

॥ ७८४१ ॥ या त्रि नरकद्वारा । पासुनियां धनुर्धरा ॥ सुटला तो नर त्वरां । साधनाच्या पाउटीं ॥ १ ॥ आत्मश्रेय आचरोनी । राहे उंस जनीं धनीं ॥ सदा सावधान मनीं । हित वागे आपुलें ॥ २ ॥ त्या थोरास थोर गती । होय जनकादी संगती । अथवा तुकया पंगती । प्रसादीक घे लाभु ॥ ३ ॥

॥ ७८४२ ॥ सत्य शास्त्रार्थ विहीन । विधि वास विसर्जन ॥ श्रुति पाठ दे लाजुन । ऐसा जो कां उन्मतु ॥ १ ॥ वागणें तें स्वेच्छाचार । जेवीं अकाळीं जळधर ॥ कार्यनाश परी उर । फोडी देउनी किंकाळी ॥ २ ॥ सिद्धी वनस्पती कैंची । शुभा अशुभा सुखाची ॥ नव्हे गोष्टी ते मुखाची पडे धर्म दुष्काळु ॥ ३ ॥ उत्तम गती त्याची हे गा । आपण मरे पीडी जगा ॥ किंवा वोणवा आवघा । तुका ह्मणे दे त्रासु ॥ ४ ॥

॥ ७८४३ ॥ तस्मात् उत्तम सच्छास्त्र । जैसें साळंकारी वस्त्र ॥ किंवा विष्णुनामें वक्त्र । वैष्णवाचें रंगलें ॥ १ ॥ विचारितां कार्याकार्य । वंद्य होय जनीं आर्य ॥ किंवा शिष्य गुरुवर्य । माया जेवीं तान्हयां ॥ २ ॥ शास्त्रें विधियुक्त जाणोनी । वागे जैसा द्व्यपाणी ॥ कर्म योग्य तूं अवनीं । होसी सखया एक रे ॥ ३ ॥ तुका जैसा कां निष्काम । झाला जगास विश्राम ॥ तेवीं तुझा गा आराम । विश्व मनीं मानीला ॥ ४ ॥

॥ ७८४४ ॥ ऐसा बोध करी विष्णु । वासुदेव जो सहिष्णु ॥ जड जीव जगाद्विष्णु । ऐके जिष्णु सावधान ॥ १ ॥ संपदेचा हा संशय । वारुनियां यदुराय ॥ केला षोडशीं आत्रेय । ज्ञाननभीं आवडीं ॥ २ ॥ परी त्याची जीवन कळा । होती स्वाधीन गोपाळा ॥ तेही न राखे वेगळा । अर्पण करी किरिटीसी ॥ ३ ॥ तेंच सत्रावीचें पय । प्राशिल जेथें वत्स न्याय ॥ तेथें तुकया प्रत्यय । वदे गुरुदास पैं ॥ ३ ॥

---

## अध्याय सतरावा.

॥ ७८४५ ॥ कुळीं सत्कुळीं कुळाधी । कुळदैवत कुळव्रधी ॥ नवल दाविलें कुळसिद्धी । जग अवघें कुळसुखी ॥ १ ॥ आतां सप्त दशा पोटीं । कैसी नाजुक हतवटी ॥ भक्ष्य सासुक किरीटी । पात्रीं देव वोगरी ॥ २ ॥ तेथें त्रिगुण मक्षिका । वारूनियां स्वाद नीका ॥ घेणें पांडूच्या बाळका ।

हरि माउलीच्या करें ॥ ३ ॥ परि सत्कवी पिपिली । ताट प्रसादा लाधली ॥ आतां द्याति जे लाधली । ते न राहे निर्वात ॥ ४ ॥ तेंच एक वेळ पुन्हा । विचारूनी जनार्दना । घे तूं केवळ सज्जना । तुकया टेवो न पाहे ॥ ५ ॥

॥ ७८४६ ॥ महाराज राजयांच्या । सत्ता नेमीं श्रीमंतांच्या ॥ ऐके प्रभू पंडितांच्या । चिद्भुवनाच्या चिज्ज्योती ॥ १ ॥ नमस्कार विश्वालया । ऐसें पार्थें स्तवूनियां ॥ पुसता झाला त्या अन्वया । बरी दृष्टी न्यासीजे ॥ २ ॥ शास्त्रविधी जे सोडोनी । यजन श्रद्धेच्या याजनीं ॥ शाची निष्ठा बोलाननी । सत्वरजीं कीं तम ॥ ३ ॥ कृष्ण गोपाळ गोवळा । सावळीया गोत्रजखेळा ॥ गोपीरमण गोवत्सळा । गोरसचोरा तुकयाच्या ॥ ४ ॥

॥ ७८४७ ॥ बोले रुक्मिणीचा कांतु । रुक्म वस्त्र विराजितु । रुक्मांगदी रुक्मवंतु । रुक्मीयाचा मेहुणा ॥ १ ॥ ऐके कपींद्रकेतना । खगेंद्रध्वज प्रिय अर्जुना । सुरेंद्र देवाधि नंदना । मज योगींद्रा प्रिय तूं ॥ २ ॥ श्रद्धा संस्कारापासूनी । त्रिधा होती जीवा मनीं ॥ सात्विक आणि राजसीनी । तामसी जे तिसरी ॥ ३ ॥ ऐक ऐसीया त्रिविधा । वेणी माया शिरी मुग्धा ॥ वरी डागिणे प्रसिद्धा । तुका जडी जडीते ॥ ४ ॥

॥ ७८४८ ॥ जैसें सत्व तैसी श्रद्धा या जीवांसी । कीं भक्ती देवासी नेमीली गा ॥ १ ॥ होतरे सर्वा या भारताच्या राया । धरा आधीं पायां ळकटी ॥ २ ॥ ज्याची श्रद्धा तोची होतो सव्यसाची । कीळकीं नळाची प्रतिष्ठा ते ॥ ३ ॥ जीव श्रद्धामय नेमुची हा स्वयें । तुका यासी माय मीच जैसा ॥ ४ ॥

॥ ७८४९ ॥ सत्वाढ्य तो देवा भजे अर्पी भावा । भूपार्थ सचिवा सेवा जैसी ॥ १ ॥ राजस ते यक्षा भजती गा रक्षा । गोरस सापेक्षा कुर्वाळी गा ॥ २ ॥ तामस भूत प्रेतीं आयुष्य वेंचीती । सिंदी छायेप्रती मद्यपी गा ॥ ३ ॥ तैसें अघोरी ते वेचुनी धनातें । राजी तुकयातें न करीती ॥ ४ ॥

॥ ७८५० ॥ शास्त्र जें न सांगे तेथें रात्रीं जागे । प्रेतावरी अंगें पढे मंत्रु ॥ १ ॥ घोर तप कैसें जोडी जीव हिंसे । नेणे तीर्थीं पीसें पर्वकाळु ॥ २ ॥ दंभें कामें किंवा अहंकार व्हावा । भल्यावरी दावा घाळवूनी ॥ ३ ॥ विशेष प्रीतीच्या बळें ही मतीच्या । चेष्टा तुकयाच्या आरंभीती ॥ ४ ॥

॥ ७८९१ ॥ करिती देह क्षीण हाची अवगुण । न पाहती सीण उभारिती ॥ १ ॥ आंत मी जीवात्मा पीडितां आक्रंदें । नेणती गा मदें मस्ती ऐसी ॥ २ ॥ देवो मी सर्वांस मज देती त्रास । काय त्या मूढांस हांसूं रडूं ॥ ३ ॥ असुर हें चिन्ह निश्चय सांगून । सांगे आन अन्न तुकयासी ॥ ४ ॥

॥ ७८९२ ॥ आतां सर्वां गोष्टी माजी घे जे श्रेष्ठी । आहार परमेष्ठी नेमीतसे ॥ १ ॥ त्या सारीखें होत गुण देहोत्पत्त । त्रिविध भासत आहार जो ॥ २ ॥ त्रिवर्गांसी प्रीय सांगू यथान्याय । मग दावूं प्रत्यय यज्ञांचा गा ॥ ३ ॥ तप आणी दान भेद घे ऐकून । जरी तूं सज्ञान तुकया ऐसा ॥ ४ ॥

॥ ७८९३ ॥ आयुष्यासी बरें सत्व आवतरे । बळ आणी बारे वैराग्य ये ॥ १ ॥ सुख प्रीतीलागीं क्षुधे दे तूं चांगी । स्थिर स्निग्ध अंगीं रसें-युक्त ॥ २ ॥ आहार हा प्रीय सात्वीकास होय । गोरस कीं प्रिय श-र्करादी ॥ ३ ॥ गोधूम तांदूळ सत्वीं मूगदाळ । तुकीं शाखा फळ तूंबी ऐसें ॥ ४ ॥

॥ ७८९४ ॥ उष्णें जीभ पोळी क्षारसिंधु उकळी । कडूतें उगळी उदरस्था ॥ १ ॥ आम्लेदांत हाले शुष्क निर्जीव झाले । आणीवीन भाले तिखें खाय ॥ २ ॥ खातां नाकीं मुखीं धूर उठे कीं दुःखीं । सर्वांगास शो-खी चैन नेदी ॥ ३ ॥ आहार राजस सद्य फळ त्यास । शोक भया यास ह्मणे तुका ॥ ४ ॥

॥ ७८९५ ॥ शिजुनी लोटला काळ बहु गेला । उठे पदार्थाला घाणी जेथें ॥ १ ॥ वाळली काचरी रस ना अंतरीं । विटलें परोपरी फेंसावलें ॥ २ ॥ शीळें ह्मणिजे मांसा व्याघ्र सडवी जैसा । सदन्ना बुरसा वाटे तेवीं ॥ ३ ॥ विदारिलें शूनें वत्सें बाळकानें । अंतु राहे ते अन्ने राही करी ॥ ४ ॥ अपवित्र आहार अपवित्र आचार । तामस प्रकार तुका निंदी ॥ ५ ॥

॥ ७८९६ ॥ नाहीं फळकांक्षा वृत्ती निरपेक्षा । तुळसीच्या वृक्षापरी सेवा ॥ १ ॥ विधि डोळयानें यजनीं हवनें । बापा लेकी मानें अलिप्तत्वें ॥ २ ॥ यजावें ते अशा एका जगदीशा । गुरुत्वें हुताशाप्रती पाळी ॥ ३ ॥ सात्विकांचा यज्ञ हाची भाव सुज्ञ । सांगीतला प्राज्ञ ह्मणे तुका ॥ ४ ॥

॥ ७८५७ ॥ अभिलाष फळीं च्युत वृक्षामाळी । पाळीत कर्दळी ते-वीं यज्ञ ॥ १ ॥ दंभार्थ चोहटी दावीतु कोल्हाटी । यज्ञीं हाटवटी तया मानें ॥ २ ॥ भरतश्रेष्ठा यज्ञ राजसाचें चिन्ह । घ्यावें ओळखून के-वळ गा ॥ ३ ॥ तुकयासी अर्थ कळला राजस्वार्थ । प्रपंच परमार्थ चाळीतसे ॥ ४ ॥

॥ ७८५८ ॥ नाहीं विधी नाहीं मंत्रु पुरा पाही । अन्नशांती तें ही सुनाट गा ॥ १ ॥ दक्षिणा ते कैसी दक्षिणा दिशेसी । दावी आणि तैसी यमकूपा ॥ २ ॥ श्रद्धा उदरीं नसे उगे भलसा मीसे । लोकीं सांगत-से सत्कारूनी ॥ ३ ॥ तामस यजन जाणसी सज्ञान । आतां सत्व चिन्ह दावी तुका ॥ ४ ॥

॥ ७८५९ ॥ देव द्विज गुरु भजे एक भावें । भिन्न त्याच्या नांवें न झाला जो ॥ १ ॥ प्राज्ञ परीयसा पूजनीं धीवसा । शुद्धिवंत कैसा अवक्र तें ॥ २ ॥ ब्रह्मचर्य खरें स्त्रीकडे ना मोहरे । अहिंसक सारे कर्मजाळ ॥ ३ ॥ हेंची देह तप जाणावें अर्जुना । वाचीकाच्या गुणा वर्णी तुका ॥ ४ ॥

॥ ७८६० ॥ नेदी कष्ट श्रोत्या ऐसें जें बोलणें । प्रेम पाल्हावणें साधु-वळी ॥ १ ॥ परी ते गा सत्य प्रिय परा हीत । कीं वेदवेदांत पाहाणें गा ॥ २ ॥ नित्य पाप करी शिकावें हव्यास । जन ह्मणती व्यास अव-तरला ॥ ३ ॥ वाचेचें हें तप जाणावें वीभत्सु । मनाचें ही इच्छु तुका-पुसे ॥ ४ ॥

॥ ७८६१ ॥ मन प्रसन्नता मौनीं ध्यानीं वागे । सौम्यत्वें न पांगे चांचल्य तें ॥ १ ॥ निग्रह मनाचा चित्तांत निष्काम । सदा स्मरे रामकृष्ण हरी ॥ २ ॥ मानस हें तप जाणावें फाल्गुना । आतां सत्वगुणा ऐक तुकीं ॥ ३ ॥

॥ ७८६२ ॥ महाश्रद्धें केलें जें कां आराधन । त्रिधा तें करून तपा लागीं ॥ १ ॥ फळेच्छा वांचूनी निष्ठायुक्त वाल्हा । जेवीं वैसवीला नार-दानें ॥ २ ॥ अथवा वामदेव कपिल दत्तात्रेय ॥ त्यांच्या पडे पाय निष्का-मत्वें ॥ ३ ॥ सात्वीक हें तप ऐकावें रे कृष्णा । राजसाची तृष्णा वर्णी तुका ॥ ४ ॥

॥ ७८६३ ॥ सन्मान वाढावा पूजा घेणें लोकीं ॥ मानी बुद्धी साकी उपडीना ॥ १ ॥ श्लाघ्यें धरी पडप आणी दंभ भारी । राजस अवधारी तप

तें गा ॥ २ ॥ चित्रीं गंगाजळ जवळीक नित्य । आदर्शीं असत्य धन जैसें ॥ ३ ॥ चंचळ अशाश्वत पार्थिवा जाणावें । आतां तमा ध्यावें तुका साज्य ॥ ४ ॥

॥ ७८६४ ॥ मूढत्वें आग्रहें स्वात्मया पीडूनी । स्वमांस रक्तांनीं देती बळी ॥ १ ॥ किंवा उगे करी मनस्वी उपास । इंद्रिय तापास चढवी तपें ॥ २ ॥ ते शत्रु मारावे उच्चाटण व्हावें । काम पुरवावे इच्छेजोगे ॥ ३ ॥ ते तामस गा पार्था तप त्वां जाणावें । आतां सत्वा भावें गाय तुका ॥ ४ ॥

॥ ७८६५ ॥ देणें विहीत कीं यया भावें पार्था । न दावी सर्वथा उपकार जो ॥ १ ॥ अंगास छेदवी झीजवी चंदन । हरास लेपन जैसें साचें ॥ २ ॥ पडे पूर्णाहूती महायज्ञीं जैसी । पात्र काळ देशीं सत्वदान ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐका रजो गुण कैसा । चोर मानी जैसा धनाढ्यासी ॥ ४ ॥

॥ ७८६६ ॥ प्रत्युपकारार्थ जो कां सावधान । पक्षासी प्रधान आमंत्रीजे ॥ १ ॥ सोयऱ्या आग्रह आहेरीं ते दृष्टी । फळापेक्षा पोटीं वाहे तैसी ॥ २ ॥ देणें घडे जरी यद्यपी निष्काम । तेव्हां वाटे ग्रामलूट केली ॥ ३ ॥ दान राजसाचें ऐसें निरोपीलें । आतां तुकीं आलें तमांध गा ॥ ४ ॥

॥ ७८६७ ॥ दान धर्म तमीं नसे संसारू । घडे तरी घोरू मार्ग ऐका ॥ १ ॥ कुत्सिता सा देशीं काळ अवकाळेंसी । वांती शूनी जैसी मिळूं आली ॥ २ ॥ आतां तें अपात्र कैसें तरी ऐक । नित्याचे पाइक भाटापरी ॥ ३ ॥ लाता बुक्या वरी जैसी बोळवण । तैसें दान पुण्य अमंगळ ॥ ४ ॥ तामस वर्णिला आतां श्रुत पंथ । ऐकावे समर्थ ह्मणे तुका ॥ ५ ॥

॥ ७८६८ ॥ ओंतत्स त्रिपदें ब्रह्म तें बोलिलें । अवर्णासी केलें नामरूप ॥ १ ॥ त्रिविध लक्षणें मानसीं वोळखे । शशी पूर्ण देखे शरदीं जेवीं ॥ २ ॥ तेणें गा पार्थिवा पूर्वीं विप्र वेद । यज्ञादि विविध बोलियले ॥ ३ ॥ तुकयाच्या दये प्राप्त गुरु दासा । पुरला धिंवसा तेणें त्याचा ॥ ४ ॥

॥ ७८६९ ॥ ह्मणोनि ओंकार यज्ञ दान तप । क्रियेचें स्वरूप वोळखिती ॥ १ ॥ वेदवेत्त्याचीया निस्तचिया विधी । प्रोक्त यथा सिद्धी प्रवर्त-

ती ॥ २ ॥ मग जें साधन विनियोगें चांग। सौंदर्याचें अंग अळंकार ॥ ३ ॥ मुखीं ब्रह्म नाम हातीं सत्य कर्म। विनियोगें वर्म दावी तुका ॥ ४ ॥

७८७० ॥ तो घट ह्मणतां मृत्तिका जाणवे। भूषणीं आघवें भांगार गा ॥ १ ॥ तत्पदीं ज्ञान जें होय कर्म ब्रह्म । बुझे गूढ वर्म चतूराब्धि ॥ २ ॥ यज्ञ दान सारें मोक्षार्थीच जाण । निष्काम तें पूर्ण कीजे तीहीं ॥ ३ ॥ ऐसें जाणोनियां छेदी संशयास। वधीं कौरवांस तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ७८७१ ॥ सत्यपणीं तेंच साधू साचपणीं। गोप्याची करणी प्रगटली ॥ १ ॥ सच्छब्दें सांतही वर्ते धनंजया । कर्म करूनीयां अलिप्तता ॥ २ ॥ निष्काम जें कर्मी साधुत्वीं भारता । सच्छब्दें योजितां येथें होई ॥ ३ ॥ मग तूज बाध न लगे गोत्रहत्या । तुका ह्मणे सत्य शास्त्रांचीये ॥ ४ ॥

॥ ७८७२ ॥ सत् या शब्दें साधु ते ही झाले सिद्ध । नलगे कर्म बाध-ब्रह्मत्वांत ॥ १ ॥ स्थिती त्याची सुज्ञा यज्ञीं दानीं तपीं । तो तंव चिद्रूपीं तच्छब्दार्थ ॥ २ ॥ तच्छब्दार्थ ब्रह्म सत् ऐसें बोलीजे। कदा न उरीजे महा मौन ॥३॥ मौन तें ही मेलें आटलें जीवपण। शिवसाक्ष खूण ह्मणे तुका॥ ४ ॥

॥ ७८७३ ॥ परी केले होम संभ्रम दानांचा । जरी कां श्रद्धेचा लेशु नाहीं ॥ १ ॥ तपादी साधनें केलीं लोकेषणा । व्यर्थ मूर्खें शीणा आदरीलें ॥ २ ॥ प्रेतास भूषणें लग्न नपुंसका । विध्वंस नेटका शृंगारू गा ॥ ३ ॥ असत् ते असाधु जीत अथवा मेले । तुकया मुकले यह परी ॥ ४ ॥

॥ ७८७४ ॥ ऐसा गीता गर्भ सत्रावा प्रसंग। झाला येथें सांग हरी-कृपें ॥ १ ॥ ज्यांत गुणभाग शेवटीं अध्यात्मा। बोलीला भक्तात्मा पार्थी-वासी ॥ २ ॥ आतां कळसाध्याय बोले परीणामी। योगीया विश्रामीं घडे तुकीं ॥ ३ ॥

---

## अध्याय अठरावा

---

॥ ७८७५ ॥ अहो ऐकियले बोळ। आला पार्थी अंगीं डोळ ॥ १ ॥ आतां शेवटीं अठरावा। जाणोनि पूसे वासुदेवा ॥ २ ॥ येथूनि गीता देवी पूजा। झाली वाचावीद वोजा ॥ ३ ॥ तुकयास महा आनंद। सांगे श्रोतया गोविंद ॥ ४ ॥

॥ ७८७६ ॥ विनविला विनय भावें । प्राण गोपीचा गौरवें ॥ १ ॥ म्हणे अर्जुन संन्यास । महाबाहो नेदी त्रास ॥ २ ॥ अहो तत्व तें स्मरतें । जाणे अज अव्ययातें ॥ ३ ॥ त्यागाचें ही हृषीकेशा । केवीं न बोलसी कैसा ॥ ४ ॥ माझ्यावरुन तुकयाचें । देह जंतु उद्धरायाचे ॥ ५ ॥

॥ ७८७७ ॥ काम्य कर्माचा ज्ञानी तो । विनियोग मनीं घेतो ॥ १ ॥ त्याग संन्यास जाणती । शुद्ध आहे ज्यांची मती ॥ २ ॥ फळ त्याग सर्व कर्म । एका सांपडले वर्म ॥ ३ ॥ ईश्वरार्पण तो त्याग । जाणे तुका सार भाग ॥ ४ ॥

॥ ७८७८ ॥ परी कर्म जें दोषाचें । हृदय भेदी जाण त्याचें ॥ १ ॥ एक बोलती टाकावे । येणें बंधना अलपवे ॥ २ ॥ नवे टाकूं ही बोलती । कोणी समूळ त्यागीती ॥ ३ ॥ तप क्रीया यज्ञ दान । आहे तुकया स्वाधीन ॥ ४ ॥

॥ ७८७९ ॥ माझा निश्चय आईक । तुज न सांगूं मायीक ॥ १ ॥ त्यागी तूंच भरतर्षभा । वाक्य जाणून प्रारंभा ॥ २ ॥ पुरुष व्याघ्र हा त्याग । जो मी जाणें यथासांग ॥ ३ ॥ बोलिला हे जो त्रिविधु । वर्णी तुका पूर्ण बोधु ॥ ४ ॥

॥ ७८८० ॥ नये सांडूं तीं करावीं । जे कां कर्मे माझ्या जीवीं ॥ १ ॥ यज्ञ दान तप क्रीया । हीं तों जडास ताराया ॥ २ ॥ पावनें हीं बुद्धि मंतीं । मार्गु दावणें लोकांतीं ॥ ३ ॥ यज्ञ दान क्रिया तपें । गेलीं तुकयाचीं पापें ॥ ४ ॥

॥ ७८८१ ॥ हें ही मीपण त्यागोनी । प्रपंचासही वंचूनी ॥ १ ॥ फळ त्याग मदर्पणें । सुख मुक्तीचें भोगणें ॥ २ ॥ करोनि माझें करणें । जया दासांचें पावणें ॥ ३ ॥ उत्तम मत हें निश्चयें । तुका विवेक धामिये ॥ ४

॥ ७८८२ ॥ नित्य कर्माच्या स्वरूपें । जो कां अनित्य आरोपें ॥ १ ॥ त्याग शास्त्रें घडेचिना । पाहे अज्ञान कल्पना ॥ २ ॥ अविवेकें करी त्याग । मूर्ख सहज ह्मणे जग ॥ ३ ॥ बोलिजे तो त्याग येथें । तम तुकया पंथें ॥ ४ ॥

॥ ७८८३ ॥ कष्ट मानुनी हें कर्म । नोहे लोकीं पाळी शर्म ॥ १ ॥ देह क्लेश भय त्यजी । जीवें जीवितास यजी ॥ २ ॥ केल्या राजस या त्यागा

काय फळ लाभु अंगा ॥ ३ ॥ तुका ह्मणे जी चतुरीं । ध्यावें सत्वास पदरीं ॥ ४ ॥

॥ ७८८४ ॥ निस विहितें जाणोनी । न सांडी तो पूर्ण ज्ञानी ॥ १ ॥ करी टाकुनी मीपण । परी नेणे भाग शीण ॥ २ ॥ कृष्णार्पण ययालागा । फलत्यागें महाभागा ॥ ३ ॥ त्याग सात्विक बोलणें । तुका सांगे लाभ घेणें ॥ ४ ॥

॥ ७८८५ ॥ निंदीना प्रवृत्तीचें । बंधू न मनीं कर्माचें ॥ १ ॥ नव्हे आसक्त निवृत्तीं । सदा सावधान मती ॥ २ ॥ वरा युक्त सत्वें त्यागी । बुद्धि रंगली निजरंगीं ॥ ३ ॥ छिन्न संशय चांगला । सत्व गुणें तुका झाला ॥ ४ ॥

॥ ७८८६ ॥ ऐके विचक्षणवंता । देहधारि जीव जंता ॥ १ ॥ कर्मत्याग हा घडेना । घडल्या दाखवी पतना ॥ २ ॥ कर्में अर्पुनीयां ब्रह्मीं । आपण वागतो निष्कर्मी ॥ ३ ॥ त्यागी तो एक बोलिजे । मज भासे तुका साजे ॥ ४ ॥

॥ ७८८७ ॥ संन्यास त्याग पूर्वीं । जो कां बोलिलों अपूर्वी ॥ १ ॥ नसे ज्यास कीं धारणा । फलें तयांसी सुजाणा ॥ २ ॥ बरें वाईट कीं मिश्रें । कर्म फळ ही अन्यत्रें ॥ ३ ॥ तुका ह्मणे कदाचित । नव्हे संन्यासी हा लिप्त ॥ ४ ॥

॥ ७८८८ ॥ आतां हेंच निःसंगता । तुज सांगूं पांडुसुता ॥ १ ॥ पांच कारणें कर्मांचीं । युक्ति बुझे सव्यसाची ॥ २ ॥ सांख्यवेदांतीं बोलिले । बरें पाहिजे ऐकिलें ॥ ३ ॥ तूं आत्मा निःसंग जाणुनी । तुका ह्मणे धरा ध्यानीं ॥ ४ ॥

॥ ७८८९ ॥ अधिष्ठान क्षेत्र कर्ता । जो या देहे संगापता ॥ १ ॥ मुख्य वागे अहंकार । घेउनि इंद्रियें सत्वर ॥ २ ॥ चेष्टा प्राणाची या दैवें । ऐसे चार हे जाणावे ॥ ३ ॥ तद्योगप्रद ऐसे । पांच तुका जाणतसे ॥ ४ ॥

॥ ७८९० ॥ काय वाचा मनें ही जे । निजकर्म आरंभीजे ॥ १ ॥ तो नर तया वाईट या । कर्मबंधन पांचीं तया ॥ २ ॥ हेंच कारण मुख्यत्वें । रक्षी संतत ही सत्वें ॥ ३ ॥ तुका ह्मणे आन एक । बोलीयला यदुनायक ॥ ४ ॥

॥ ७८९१ ॥ ऐसे असोनी ही हीरे । कर्त्ता महा चमत्कारें ॥ १ ॥ आत्मयास जो केवळा । मनीं विचार ना स्थळा ॥ २ ॥ नसे बुद्धीचा ही

शोध । तेथें कैचा शास्त्रबोध ॥ ३ ॥ अंध म्हणावें तयासी । नेणें जो का तुकयासी ॥ ४ ॥

॥ ७८९२ ॥ अहो मीच सर्वकर्त्ता । नेणें वार्ता जन्मांत ॥ १ ॥ केल्या कर्मीं द्यावें फळ । बुद्धि केवळ शीरेना ॥ २ ॥ मग त्याच निःसंशया । हातें लया जग पावे ॥ ३ ॥ कधीं बद्धता न वचे । तुकया त्याचें नवल ॥ ४ ॥

॥ ७८९३ ॥ साधुलागीं साधन तें । कर्मा न तें करूनी ॥ १ ॥ पारि त्रिविध त्या भेदु । तुज संवादु जाणऊं ॥ २ ॥ कर्म करण हा कर्त्ता । हेच वार्त्ता भेदाची ॥ ३ ॥ कर्म संग्रहो हि त्रिधा । तुका सिद्धा निरूपी ॥ ४ ॥

॥ ७८९४ ॥ ज्ञान कर्म कर्त्ता हे गा । आले भोगा हे भेद ॥ १ ॥ सत्त्व रज तम तिन्ही । या प्रमाणीं वोळखे ॥ २ ॥ सांख्यशास्त्रमतें सांगूं ॥ मग पांगू नको तूं ॥ ३ ॥ ऐके यथाविधी राया । तुका अद्वयाचा संगी ॥४॥

॥ ७८९५ ॥ सर्वां भूतीं देवो एक । हा विवेक जागृत ॥ १ ॥ भाव अव्यय पाहाणें । भिन्नपणें चळेना ॥ २ ॥ नाशिवंतीं अविनाश । नलगे पाश यमाचा ॥ ३ ॥ ऐसें पाहे तें सात्विक । ज्ञान एक तुकयाचें ॥ ४ ॥

॥ ७८९६ ॥ पृथक्भावें पाहे जगा । द्विज मांगा निवडी ॥ १ ॥ जीव भासे नेणे शीवा । नावा नावा क्षणीक ॥ २ ॥ कोळें गोरें लोहो हेम । हंसोत्तम कावळा ॥ ३ ॥ देखे राजस ज्ञानातें । जें तुकयातें नेणे गा ॥ ४ ॥

॥ ७८९७ ॥ सर्व कारणीं ते गती । अंधमती पाऊली ॥ १ ॥ स्वात्मकार्या वांचूनियां । नेणे जाया कीं नर ॥ २ ॥ नसे तत्वीं अशाश्वतीं । जे पाहाती अयुक्त ॥ ३ ॥ क्षुद्र ज्ञानें गर्व पोसे । तुका नसे तामस ॥ ४ ॥

॥ ७८९८ ॥ नीतीपंथिचा निःसंग । केला त्याग अहंते ॥ १ ॥ प्रिया प्रिय नेणे जो कां । गुरुनायका चिंतनीं ॥ २ ॥ रोज कर्मींत निराशा । प्रेमपाशा सांपडला ॥ ३ ॥ कर्म सत्वाचें तें झालें । ज्यांत डोले तुकया ॥ ४ ॥

॥ ७८९९ ॥ स्कंदीं घेतला मी पणें । आन शाहणे न लेखी ॥ १ ॥ काम आशा पुरवाशी । हेच ओवी धुंडाळी ॥ २ ॥ अति सायासें विषयो । कीं मळयो ज्या संगीं ॥ ३ ॥ केलें कर्म तें राजस । तुका ज्यास न पाहे ॥ ४ ॥

॥ ७९०० ॥ माया बंधु जयामाजी । कीं घात जी पराचा ॥ १ ॥ लय पावे स्वात्म जीव । ऐसी हाव वोखटी ॥ २ ॥ करितो दंभु लोकीं । धर्मादिकीं नांदना ॥ ३ ॥ छंद तामस कर्म तें । तुकयातें मानेना ॥ ४ ॥

॥ ७९०१ ॥ फळाशा न अभिमान । परी मान उत्सवीं ॥ १ ॥ धृती जयाची ते नेटकी । नाचे टाकी कल्पना ॥ २ ॥ झालें गेलें निःसंशय । न सिरे पाय वासने ॥ ३ ॥ कर्त्ता सत्वगुणी खरा । ये उत्तरा तुकयाचा ॥४॥

॥ ७९०२ ॥ कर्मी फळाशा गुंडाळा । जो कां माळा पाळक ॥ १ ॥ कृपण मलीन जे वृत्ति । जीव घाती सर्वदा ॥ २ ॥ हरिखें सर्वेच शोस वाहे। क्षण पाहे विचवु ॥ ३ ॥ ऐसा राजसु हा कर्त्ता । तुका परता निवेदी ॥ ४॥

॥ ७९०३ ॥ आतां युक्त नसे जया । पापी काया कुटीळ ॥ १ ॥ शठ आळसी कपटीया । ह्मणों तया तामस ॥ २ ॥ द्वेषी दीर्घसूत्री पुरा । हा कर्त्तारा तमची ॥ ३ ॥ तुका ह्मणे सत्यवंत । हरी सांगत पुढारा ॥ ४ ॥

॥ ७९०४ ॥ बुद्धि धारणेचे पार्था । गुण सर्वथा ऐक रे ॥ १ ॥ भेद त्रिविध बोलिले । आह्मी ठेविले जे पोटीं ॥ २ ॥ तेंच तुज सर्व आज । सांगों गुज गोप्य हीं ॥ ३ ॥ पृथक्‌कारें धनंजया। जें तुकया सांगेल ॥४॥

॥ ७९०५ ॥ जाणे प्रवृत्ती निवृत्ती । चोख मति विचारू ॥ १ ॥ कार्याकार्य भयाभयें । हा अन्वय घेतला ॥ २ ॥ बंध मोक्षाची ओळख । झालें सुख मग त्या ॥ ३ ॥ निर्भय बुद्धि ते सात्विकी । तुकया लोकीं पावन ॥ ४ ॥

॥ ७९०६ ॥ यया धर्म अधर्मास । जें मानस जागृत ॥ १ ॥ कार्याकार्य तयापरी । निजांतरीं ओळखे ॥ जाणे सर्व नेणें एक ।जो व्यापक ।चिदात्मा ॥ ३ ॥ राजस ते बुद्धि आण । नव्हे प्राण तुकयाचा ॥ ४ ॥

॥ ७९०७ ॥ आतां अधर्मातें धर्म । नेणे वर्म दुरात्मा ॥ १ ॥ वागे विपरीत अर्थी । तो परमार्थी पाहेना ॥ २ ॥ अविद्या व्याली गुंडें । विख चढे गर्वाचें ॥ ३ ॥ वेद शास्त्र निंदी ज्यास । ते तामस गा बुद्धि ॥ ४ ॥ आतां ऐका सत्वगुण । उण खुण तुकयाची ॥ ५ ॥

॥ ७९०८ ॥ आतां त्रिगुण ते धृती । सांगों स्पष्ट तुज प्रती ॥ प्रथम सत्वाची जे रीती । श्रवण करी भूमीपा ॥ १ ॥ ज्या कां धरीजे धारणें । अव्यग्रता निश्चलपणें । मन प्राणेंद्रियाचरणें । विश्वंभरीं जें मिळे ॥ २ ॥ तेथें अविद्या राहिली । जैसी मंथरा दुर्बोली ॥ रामें नाहीं उद्धरिली । ऐसी परी अलिप्त ॥ ३ ॥ तुका विनवी साधूस । सत्वधृति हे देवास । आवडली अर्जुनास । सांगें प्रेम आदरें ॥ ४ ॥

॥ ७९०९ ॥ येऊनियां देहगांवा । स्वर्ग संसार दोसवा ॥ नांदे आनंद या जीवा । त्रि उपायें करूनी ॥ १ ॥ मनोरथाचीया ठायीं । धर्म अर्थ काम भावी ॥ तेणें धैर्य बळें पाहीं । क्रिया करी उदीम ॥ २ ॥ वासना जे इच्छूं जाय । लाभ चौगुणीं तो होय ॥ प्रसंगें न लाहे । साह्य झालीया धृति ॥ ३ ॥ कृष्ण सांगत अर्जुना । ऐक बापा विचक्षणा ॥ तुका ह्मणे जाणा । हे धारणा राजसी ॥ ४ ॥

॥ ७९१० ॥ जिणें निद्रा अखंडित । स्वप्नबोधाचा पंडित ॥ सदां भयानें दंडित । तरीं न सोडी विषादु ॥ १ ॥ मदादिकास न सजी । पार्थी मस्त तमामाजी ॥ सास दुर्बुद्धि ते राजी । माळ घाली घातकी ॥ २ ॥ ते गा धारणा तामसी । सत्य सांगों तूजपासी । जे कां नावडे तुकयासी । देह क्षेत्रामाझारीं ॥ ३ ॥

॥ ७९११ ॥ आतां ह्याच्या वाटणीला । आलें त्रिविध सुखाला ॥ ऐकावें कीं तूं दादुला । होसी विरक्ति वधूस ॥ १ ॥ लागे योगियाचें चित्त । ययाध्यासें दुःखातीत ॥ वृत्ति होइल निभ्रांत । पंचाक्षरी विवसीये ॥ २ ॥ नाश झालया कृतक्लेशा । सुख अक्षय नरेशा ॥ तुका ह्मणे जैसी दशा । येतां नुरे दरिद्र ॥ ३ ॥

॥ ७९१२ ॥ कटु प्रथम औषधीं । पुढें हरी महा व्याधी ॥ किंवा कष्टपाका मधीं । दे मग सुख तृप्तीचें ॥ १ ॥ तैसें विखवत भासे । सेवीं अमृत होतसे ॥ चित्त बुद्धिच्या उल्हासें । प्राणी पावे प्रसादु ॥ २ ॥ हें गा सात्विकाचें सुख । आह्मी सांगों प्रसन्मुख ॥ आतां कांहीं तैसें तिख । तुका वर्णी रजातें ॥ ३ ॥

॥ ७९१३ ॥ विषय इंद्रिया मीळणी । होती सुखा वोळगणी ॥ तेथें हरीला लोळणी । घालूं वाटे सर्वदा ॥ १ ॥ मग काय तें अमृत । शिळें ह्मणुनि वीटे चित्त ॥ आतां शेवटीं अहित । मैथुन जेवीं शुनीचें ॥ २ ॥ कर्जावरी लग्नारंभु । व्याघ्र सौजन्याचा लाभु ॥ पुढें विघ्नाचा प्रारंभु । धेनु पावे शेवटीं ॥ ३ ॥ धन धणी चोर होती । परी रक्षका तोडिती ॥ तुकयाचे न लगे मती । सुख तें गा राजस ॥ ४ ॥

॥ ७९१४ ॥ आरंभींच घाला पडे । फळ प्राप्ति वेळे रडे ॥ कोल्हाटियजा परवडे । करिती उपजीविका ॥ १ ॥ मारा भेणें परग्रहीं । प्रमदा राहे दुराग्रहीं ॥ तेथें तेच तें विदेही । जे कां उठती उमाळे ॥ २ ॥ आतां मद्य

प्राशिलीया । त्याणें सुख स्मृती लया ॥ जाय तेथें निजलिया । वाटे गेला स्वर्गासी ॥ ३ ॥ अळसें होय वपु जड । सुख तामस निवाड ॥ तुका ह्मणे ज्याणें द्वाड । तें सात्विक ऐकावें ॥ ४ ॥

॥ ७९१५ ॥ न तें पृथ्वी माझी पाहो । स्वर्गी जयाचा संदेहो ॥ तेथें सिद्धगण समुहो । सत्वाहीन बापुडें ॥ १ ॥ अमरगणीं जें मिळेना । पाहतां इंद्रानें स्वनयना ॥ मज भासतें अर्जुना । या त्रिगुणा नातळे ॥ २ ॥ माझा जीव तें गा सत्व । तेथें सुखावला शिव ॥ केला खाणीचा उद्भव । परि सत्व न टळे ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐका वचन । काय बोलिला भगवान ॥ तेथें देऊनियां मन । वर्ण धर्म अवधारा ॥ ४ ॥

॥ ७९१६ ॥ विप्र बाहुजां वैश्यांला । शूद्र शुद्ध तमीं ज्याला । क्रिया पृथक याला । पूर्वीं असे स्थापिली ॥ १ ॥ अधिष्ठान स्वभावें जे । झाले त्रिगुण सहजे ॥ तया गुणीं मुनीराजे । व्याख्या बहू वाणिली ॥ २ ॥ तेच येथें ही प्रसंगीं । कथीं अर्जुना सारंगी ॥ तुका सर्व जनालागीं । निर्मिलासे वदाया ॥ ३ ॥

॥ ७९१७ ॥ तप प्रथम विप्राचा । गुणदायक मोक्षाचा ॥ क्षमेविण नाश त्याचा । होता फळ ना लागे । १ ॥ शम दम काशास्तव । घ्यावा इंद्रियांचा जीव ॥ शौच तैसाच स्वभाव । आस्तिकाचा पाहिजे ॥ २ ॥ नव्हे भूतांसी वांकुडा । ज्ञानें नव्हे विषयीं वेडा ॥ वक्ता विज्ञान पवाडा । सांगे जगा तारणी ॥ ३ ॥ क्रिया ब्राह्मणा प्रथम । सांगे पार्था पुरुषोत्तम ॥ पुढें क्षत्रियाचे नेम । तुका वर्णी स्वानंदें ॥ ४ ॥

॥ ७९१८ ॥ शौर्य तरी रणधीठ । तेजें शस्त्राचीं तीखट । परी धारणा चोखट । जाणें न्याय अन्याया ॥ १ ॥ दक्ष जैसा दक्षापरी । युद्धीं पळवणे वैरी ॥ दाता जेवीं धरेवरी । पुण्यश्लोक जगासी ॥ २ ॥ सेवा मंहताची जाणें । तद्वत मन देवा अर्पणें ॥ हीं गा नव्हती लक्षणें । जगदोद्धार गुरु तो ॥ ३ ॥ राज्याअंतीं नरक तया । बोलणार पावे क्षया ॥ सुख साम्राज्य आलेया । आले तुका एकत्व ॥ ४ ॥

॥ ७९१९ ॥ उदरार्थ कुटुंबार्थ । करि कृषि वळी स्वार्थ ॥ परी तयांत परमार्थ । जें रक्षण गाईचें ॥ १ ॥ द्रव्य व्यवसावो तेवीं । वाणि ज्यांत उठा ठेवी ॥ वैश्य कर्म तृतिय भावीं । तूं ओळखे सुजाणा ॥ २ ॥ आतां शूद्र जोकां असे । वर्णत्रय सेवा वसे ॥ त्याचें जीवन जाण ऐसें । चार वर्णी ह्मा

क्रिया ॥ ३ ॥ सांगावया हें कारण । क्षत्रिय वंशीं तूं निर्माण ॥ झाल्या सुटेल कैसें रण । तुकया जैसा संसारू ॥ ४ ॥

॥ ७९२० ॥ आपुलालें कर्माचरें । वर्णाश्रम या आधारें ॥ जें कां स्वहित उपचारें । आलें असे वांटणी ॥ १ ॥ न करितां प्रयत्न कांहीं । सिद्धी बोळे त्याच्या गेहीं ॥ नवल होय लोकीं तीहीं । नर हा ह्मणती पुण्यात्मा ॥ २ ॥ स्पष्ट सांगतों वीरेशा । आकर्णीं तूं गुडाकेशा ॥ साहिसेसी प्राप्त दशा । प्राण्या प्रगटे भूलोकीं ॥ ३ ॥ जरी सांडिला स्वधर्म । मग आवघें वृथा कर्म ॥ न सांपडे सौख्य वर्म । तुका जेणें सांगिजे ॥ ४ ॥

॥ ७९२१ ॥ भूतप्रवृत्ति जेथुनी । होती उत्पन्न मेदिनी ॥ स्थिति पालक निदानीं । प्रळय दावी रूसल्या ॥ १ ॥ जगा व्यापिलेसें जेणें । जो विश्वात्मा येणें गुणें ॥ त्यास स्वधर्म आचरणें । तोषवावें संतत ॥ २ ॥ त्याचे सोळा प्रकाराचें । कर्मचि एवंविध वाचे ॥ पूजन घडे माधवाचें ॥ नित्य नूतन आवडीं ॥ ३ ॥ त्याचा सहज उतरायी । आशीर्वाद ये ते ठायीं ॥ मनोरथ पुरे पायीं । चाली तुका मुरकुंडी ॥ ४ ॥

॥७९२२॥ नीच न मानी स्वधर्म । आले भाग प्रांत कर्म ॥ ज्ञान झालें तरी श्रम । स्वयातिचा न मानिजे ॥ १ ॥ बाळा मायच पाहिजे । तेथें उर्वशी ना सुजे ॥ मीनें जळावीण मरिजे । मधुघटाभीतरीं ॥ २ ॥ एवं न करी वेदपत्र । यति हातीं आलें शस्त्र ॥ व्यर्थ तेवीं शोभे वक्र । स्वात्म धर्म आचरणें ॥ ३ ॥ बोलसी तूं गोत्रवधीं । हत्या वडते संबंधी ॥ तव कर्म पाप वधी । येसी शुद्धी तुकयाचे ॥ ४ ॥

॥ ७९२३ ॥ वर्ण विभागांत सुकृत दुष्कृत । पुढें जन्म होत त्याच्या लेशें ॥ १ ॥ तेथें गुणी खरें अवगुणी निकरें । वेष्टिलासे धुरें जैसा अग्नी ॥ २ ॥ यास्तव वोखटें । मानिजे गोमटें । चैत्रीं कडुवटें निंब जेवीं ॥ ३ ॥ कुश्चळ भ्रतारीं मन ठेवी नारी । पावेल संसारीं तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ७९२४ ॥ निष्काम जें मन मुक्तिचें भुवन । त्या कर जोडून सिद्धि नमी ॥ १ ॥ पावतो संन्यासें प्रपंच उदासें । मानस उल्हासे हरीपदीं ॥ २ ॥ कर्मीं नव्हे लिप्त बुद्धि जितचित्त । झाला स्पृहागत आत्मबोधें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जन्मसार्थक उत्तम । तयामाजी प्रेम अनंताचें ॥ ४ ॥

॥ ७९२५ ॥ दे तु गुरुकृपा लाभ झाला सोपा । पावला निरोपा सिद्धाचिया ॥ १ ॥ कैसा ब्रह्म पावे सिद्धी ज्यास भावे । ओवाळिती नावें चि-